मूल्य रु. १० वार्षिक वर्गणी रु. १२०    Visit: http:/www.bsmdadar.com    RNI No.1262096  Title Code: MAHMAR45383    Published on 10th April 2015


श्री. वसंत नामे, सौ. शुभदा नामे

पार्ले येथील सुप्रसिद्ध

**पार्लेश्वर वडापाव सम्राट**



**स्वादिष्ट वडापाव**

दादर (प) येथे (सुविधाशेजारी)

समारंभासाठी बटाटावडा व समोसाच्या ऑर्डर्स स्वीकारण्यात येतील.

मराठा भुवन (सुभाष रोड), भोमले चौक (नेहरु रोड), विलेपार्ले आणि मालाड (पूर्व) येथेही

**9324047619, 9819943106**


ॐ

॥ उद्धरेदात्मनात्मानम् ॥

ब्राह्मण सेवा मंडळ प्रकाशित

# स्वयम्

## ब्राह्मण सेवा

एप्रिल २०१५

वर्ष १ • अंक ५




- Deepak Chheda -

98213 30817

**Chheda Modak**

**Estate Consultant**

Vile Parle/ Andheri/ Santacruz/ Goregaon

Contact for : sale-Purchase & Leave Licence of Flats, Shops, Office and RE-DEVELOPMENT PROJECTS

Shop No.3, Sidhachal Building,
Hanuman Road, Vile Parle (E.),
Near Cosmos Bank,
Mumbai- 400 057.
Tel.: 022-26184268/ 69, 26136954
email: chhedamodak@yahoo.com

# ब्राह्मण सेवा मंडळ - पदाधिकारी

दि. २९ मार्च २०१५ रोजी एप्रिल २०१५ ते मार्च २०१८ या कालावधीसाठी झालेल्या निवडणुकीचा निकाल खालीलप्रमाणे :

**कार्यकारी सदस्य - स्त्री पुरुषांसाठी - ४ जागा** : १.विलास विठ्ठल वैद्य २.मुरलीधर दिनेश गानू ३.शंतनु विष्णु अभ्यंकर ४.महेन्द्र मधुकर मणेरीकर

**कार्यकारी सदस्य - स्त्रियांसाठी राखीव - २ जागा** : १.शिल्पा वसंत सहस्रबुध्दे २. कल्पना वसंत साठे



**श्री.सतीश काशिनाथ मराठे**
विश्वस्त



**श्री.श्रीकृष्ण विश्वनाथ लिमये**
विश्वस्त



**श्री.भालचंद्र विश्वनाथ भेडसगांवकर**
विश्वस्त



**श्री.विनायक कृष्णाजी लेले**
विश्वस्त



**श्री.गिरीश श्रीकृष्ण गोडबोले**
विश्वस्त



**श्री.हिमांशु वासुदेव काणे**
विश्वस्त



**श्री.पुष्कराज प्रभाकर सोमण**
कार्यकारी विश्वस्त



**श्री.संतोष बाळकृष्ण वैद्य**
उपाध्यक्ष



**श्री.अनिरुध्द सदाशिव गोडसे**
उपाध्यक्ष



**श्री.अभय अनंत सावरकर**
कार्याध्यक्ष



**श्री.विलास विठ्ठल वैद्य**
उपकार्याध्यक्ष



**सौ.कल्पना वसंत साठे**
प्रमुख कार्यवाह



**सौ.नीरजा दीपक करंदीकर**
संयुक्त कार्यवाह



**श्री.दिलीप देवदत्त शेटे**
संयुक्त कार्यवाह



**श्री.सतीश कृष्णाजी विद्वांस**
कोषाध्यक्ष



**श्री.योगेश यशवंत केळकर**
उपकोषाध्यक्ष



**श्री.शंकर रामचंद्र देसाई**
कार्यकारी सदस्य



**सौ.शिल्पा वसंत सहस्रबुध्दे**
कार्यकारी सदस्य



**सौ.वृंदा विलास खानापूरकर**
कार्यकारी सदस्य



**सौ.नीला विद्याधर वैशंपायन**
कार्यकारी सदस्य



**श्री.कौस्तुभ वसंत महाजन**
कार्यकारी सदस्य



**श्री.दिनेश मुरलीधर गानू**
कार्यकारी सदस्य



**श्री.महेंद्र मधुकर मणेरीकर**
कार्यकारी सदस्य



**श्री.शंतनु विष्णु अभ्यंकर**
कार्यकारी सदस्य



**सौ.अधिता अर्चिस लेले**
स्विकृत सदस्य



**सौ.संपदा राजेंद्र भिडे**
स्विकृत सदस्य

# "तर सांगायचं म्हणजे.."

नमस्कार मंडळी,

हिंदू नववर्षाचे ठिकठिकाणी नववर्ष यात्रांचे आयोजन करून, गुढ्या उभारून आपण सर्वांनी जंगी स्वागत केले. घरोघरी थंडगार पन्हे आणि चटकदार आंब्याची डाळ, चैत्रगौरीच्या हळदीकुंकू समारंभात हजेरी लावू लागली. रंगीबेरंगी बोगनवेल, पिवळा जर्द बहावा, लाल-केशरी गुलमोहर बहरू लागलाय. पिंपळाच्या झाडाला लालसर गुलाबी कोवळी पालवी फुटू लागली आहे. फुलबाजारात मदनबाण, सुरंगी दरवळू लागली आहे. रस्त्यावर फळांच्या गाड्या सोनेरी फणसाच्या गऱ्यांनी आणि लुससुशीत ताडगोळ्यांनी लगडू लागल्यात. चोहीबाजूंनी असा फळाफुलांमधून उधळलेला 'वसंत' पहाताना क्षणभर कां होईना आपण ऊन्हाची काहिली विसरतो, नाही कां ?

माझ्या लहानपणी मला आठवतं, माझी आजी गच्चीवर चटया, सतरंज्या पसरून त्यावर जरीकाठाच्या ठेवणीतल्या साड्या ऊन्हात दिवसभर पसरून ठेवायची. म्हणायची, 'चैत्राचं ऊन दिलं की, जरीकाठी साड्यांना कसर लागत नाही.' सणासमारंभाव्यतिरिक्त नेसल्या न जाणाऱ्या भारी साड्या टिकवण्याचा साधा-सरळ घरगुती उपाय. एका पिढीकडून पुढच्या पिढीकडे हस्तांतरित होणारे अनुभवाचे बोल आहेत. भगिनींनो, पाहूया करून.

याच निसर्गाच्या लहरीपणाचे मात्र यंदा गालबोट लागलेय. त्याची वक्रदृष्टी, आबालवृद्ध ज्याची आतुरतेने वाट पहातात त्या आंब्या-काजूवर फिरली आहे. अवकाळी पावसाने पार झोडपून काढलंय हो त्यांना ! हा फळांचा राजा सर्वांपर्यंत यंदा पोहोचू शकतोय कां ? याची साशंक मनाने पण आशेने वाट पाहूया.

मंडळी, मागील महिन्यात होळी-धुळवड आपल्या 'आनंदाश्रमातील' वृध्दांनीसुद्धा मोठ्या उत्साहाने साजरी केली बरं का ! याची व गुढीपाडवा, चैत्रगौर हळदीकुंकू समारंभाची क्षणचित्रे या अंकात प्रसिध्द करीत आहोत.

आणि हो, आणखी एक महत्वाची बातमी...मंडळाच्या घटनेनुसार २९ मार्च २०१५ रोजी चक्रगती निवडणूका पार पडल्या. स्त्री राखीव दोन पदांची बिनविरोध निवड झाली आणि पुरुष गटाच्या चार पदांची निवडणूक नियमानुसार झाली. या अंकात निवडणुकीचा निकाल तसेच नव्याने गठीत झालेल्या कार्यकारिणीचा तपशील दिलाच आहे.

१ मे २०१५ रोजी मंडळाच्या दादरच्या वास्तुचा वर्धापनदिन साजरा होणार आहे. त्यानिमित्त ३० एप्रिल रोजी करमणुकीचा कार्यक्रम व १ मे रोजी श्री सत्यनारायणाची महापूजा संपन्न होईल.

मंडळाच्या शतकमहोत्सवी वर्षाच्या तयारीला आता वेग येऊ लागला आहे. मलपृष्ठ क्र. ३ वर याची विस्तृत माहिती देत आहोत. सर्व सभासदांचा सक्रीय सहभाग प्रार्थनीय आहे.

चला तर मंडळी, वर्धापनदिनाच्या कार्यक्रमाला भेटूच.

धन्यवाद !

सौ. कल्पना साठे

पृष्ठ प्रायोजकः श्री. संतोष वैद्य

## आगामी कार्यक्रम

### नाट्य अभंगरंग

३० एप्रिल २०१५, रात्रौ ९ वाजता

कलाकार :
नीलाक्षी पेंढारकर, पं. सुरेश बापट

साथसंगत :
मकरंद कुंडले, धनंजय पुराणिक

निवेदन : दीपाली केळकर

स्थळ
संस्थेच्या दुसऱ्या मजल्यावरील वातानुकूलित सभागृहात


कार्यकारी संपादक

- **सौ. कल्पना वसंत साठे**

स्वयम् संपादकीय मंडळ

- **श्री. विनायक कृष्णाजी लेले**
- **श्री. संतोष बाळकृष्ण वैद्य**
- **श्री. अभय अनंत सावरकर**
- **सौ. अधिता अर्चिस लेले**
- **सौ. नीला विद्याधर वैशंपायन**
- **श्री. घन :श्याम त्रिंबक जोशी**

संपादन सहाय्य

- **हर्डीकर ॲण्ड असोसिएटस्**

मुखपृष्ठ

- **प्रज्ञा हरणखेडकर**

अंक सजावट व मांडणी

- **एपीज डिझाईन ॲण्ड प्रिन्टस्**

संपादकीय विभाग पत्रव्यवहार

- **स्वयम्, ब्राह्मण सेवा मंडळ,**
  भवानीशंकर रोड, दादर (प),
  मुंबई ४०० २८

दूरध्वनी : २४२२९११८, २४३७१९४९

कार्यालयीन वेळा :
सकाळी ८.३० ते १२.३०
सायंकाळी ४.३० ते ८.३०
रविवार बंद.

ई-मेल : svayambsm@gmail.com
वेबसाईट :www.bsmdadar.com

# ये रे ये रे पैसा...

## श्रीमंत व्हा

-जयंत विद्वांस

श्रीमंत कोणास म्हणावे...ज्याच्या जवळ दोन कोटी आहेत तो ? पाच कोटी आहेत तो ? पाचशे कोटी आहेत तो की पाच हजार कोटी आहेत तो ?. पाच हजार कोटी रुपये असणाऱ्या माणसासमोर पाच कोटी रुपये असणारा अगदीच गरीब असेल. मग श्रीमंत कोणास म्हणावे ? श्रीमंती म्हणजे सुबत्ता. आपल्या राहणीमानानुसार आपल्या संपूर्ण आयुष्यात मागच्यापेक्षा आपण पुढे असू तर आपण श्रीमंतच असू.

ही श्रीमंती किंवा सुबत्ता येण्यासाठी व ती टिकून रहाण्यासाठी आपल्याला जरा 'हटके' विचार करणे गरजेचे आहे. गुंतवणूक जरा वेगळ्या नजरेने करणे गरजेचे आहे. गुंतवणूक म्हटले की, आपल्याला पहिला पर्याय -पोष्ट ऑफिस आठवतो, दुसरा पर्याय - बँक ठेवी, तिसरा पर्याय - सोने-चांदी, आयुर्विमा आणि सर्वात शेवटी म्युच्युअल फंड व शेअर बाजार आठवतो. आर्थिक सुबत्तेसाठी हाच 'नजरिया' बदलणे आवश्यक आहे.

श्रीमंत या शब्दाला इंग्रजी प्रतीशब्द RICH असा आहे. यातील प्रत्येक आद्याक्षराने चालू होणारा दुसरा शब्द श्रीमंती परिप्रमाण दर्शवतो. यातील

**R** म्हणजे Real Estate - स्थावर मालमत्ता

**I** म्हणजे Investment in shares/mutual fund - शेअर किंवा म्युच्युअल फंडातील गुंतवणूक

**C** म्हणजे Career - म्हणजे आपला व्यवसाय, उद्योग आणि

**H** म्हणजे Health - म्हणजेच आरोग्य

या चार शब्दांचा अभ्यास आपल्याला श्रीमंतीकडे घेऊन जाणारा आहे. पारंपरिक गुंतवणूक थोडीशी बाजूला ठेऊन या चार अंगाने गुंतवणूक करणे गरजेचे आहे.

**स्थावर मालमत्ता** - यात घर, दुकाने, गोदामे, जमीन ह्यांत गुंतवणूक मोडते. जमीन मर्यादित आहे. मागणीनुसार पुरवठ्यात वाढ करता येत नाही. म्हणून दीर्घ मुदतीत या सर्वांची किंमत वाढतच जाते. जागा योग्य ठिकाणी निवडणे फार महत्वाचे आहे. आपल्या कुवतीनुसार लहान दुकान सुध्दा विकत घेऊन बँकांना ATM यंत्र बसवण्यासाठी भाड्याने देता येते. मुंबईत राहाणाऱ्या प्रत्येकाला आपले पुण्यात एक घर असावे असे वाटते. घर कुलूप लावून बंद न ठेवता भाड्याने द्यावे. परंतु असे फारच थोडे लोक करतात. बहुतेक सर्वजण शनिवार-रविवार जोडून सुट्टी आली की पुण्याला रहायला मिळावे म्हणून घर बंद ठेवतात. मग सुट्टीचा पहिला दिवस घर साफ करण्यात जातो आणि शेवटचा दिवस काढलेले सामान पुन्हा पॅक करून ठेवण्यात जातो. सुट्टी उपभोगण्याऐवजी 'श्रमसाफल्यात' जाते. या उलट घर भाड्याने दिल्यास कर्जाचा हप्ता कमी होतो. सुट्टी खऱ्या अर्थाने एनजॉय करण्यासाठी हॉटेलमध्ये रहावे. निदान आपल्याला कामे करावी लागत नाहीत.

जागा निवडतांना पूर्ण विकसित (Developed) भागात घेतल्यास किंमत जास्त मोजावी लागते. या उलट जो भाग अजून पूर्णपणे विकसित झालेला नाही अशा भागांत किंमत कमी असतात. जागा जशी विकसित होत जाते, आजुबाजूस सोयी निर्माण झाल्यावर किमती वाढू लागतात व फायदा खूप होतो.

जागांच्या किमती कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही परंतु, भारतात भरपूर लोकसंख्या आणि मर्यादित जमीन यामुळे 'किंमती खूप कोसळल्या' असे होण्याची शक्यता कमीच. २००८ साली अमेरिकेत आलेल्या 'सब प्राईम मंदी' मध्ये जागांच्या किमती खूप उतरल्या परंतु जागांची भाडेवाढ झाली म्हणून ज्यांना दीर्घकालावधीसाठी गुंतवणूक करावयाची होती, त्यांचा दोन्ही बाजूंनी फायदा झाला.

**शेअर्स आणि म्युच्युअल फंड गुंतवणूक :**

आपण किती रकमेची जोखीम घेऊ शकतो इतकी रक्कम बाजूला काढून, या विषयाचा अभ्यास करून गुंतवणूक केल्यास दीर्घमुदतीत खूप फायदा होतो. याला मर्यादा नाही. माझ्या बाजूचे तीन लेखक याचे तुम्हास छान मार्गदर्शन करतील.

**करिअर - आपला व्यवसाय किंवा उद्योग**

आपण ज्या व्यवसायात किंवा उद्योगात असू त्यातील नवनवीन ज्ञान कायम आत्मसात करत रहावे लागते. पूर्वी वयाच्या पंचवीस वर्षापर्यंत ज्ञानार्जन, पुढे ३५ वर्षे एखाद्या ठिकाणी नोकरीला गोंद लावून चिकटायचे




ठरलेले असायचे. आता वयाच्या ६०व्या वर्षीसुध्दा नवीन विषय शिकावेच लागतात. आपल्या क्षेत्रात नवीन होणारे संशोधन आत्मसात करावेच लागते. न केल्यास आपण इतरांपेक्षा मागे फेकले जातो. औद्योगिक जगतात ३५ ते ४० वयादरम्यान नोकरीतून स्वल्पविराम घेऊन एम.बी.ए. करणारे किंवा शास्त्र शाखेतील पी.एच.डी करणारे उच्चपदस्थ खूप आढळतात. आजच्या गळेकापू स्पर्धेमध्ये तुमच्यासारखे किंवा तुमच्यापेक्षा जास्त शिकणारे खूप असतात.

आर्थिक नियोजन करतांना तरुण जोडपी या वयांत नवीन शिक्षणासाठीची आर्थिक तरतूद करण्याचे आवर्जून नमूद करतात. मागील अनुभव व नवीन शिक्षणातील गुंतवणूक यामुळे इतरांपेक्षा मोठ्या अंतराने पुढे जातात. या अनुशंगानेच काही पेशांमध्ये जसे सी.ए.,

वकील, आर्थिक नियोजनकार, डॉक्टर यांना दरवर्षी आपले ज्ञान अद्ययावत करण्यासाठी काही तासांचे अभ्यासक्रम पूर्ण करावे लागतात. अन्यथा त्यांना पुढील वर्षी प्रॅक्टीस करता येत नाही.

आर्थिक क्षेत्रातील या बाबतचे उदाहरण द्यायचे झाल्यास २००४-०५ मध्ये सेबीने कायदा केला की शेअर बाजारात उप-दलाल शेअर्स खरेदी विक्रीसाठी कॉन्ट्रॅक्ट नोट देऊ शकत नाहीत. भारतातील जवळपास आठ ते दहा हजार उप-दलाल या निर्णयाने बाधित झाले. तसेच तीन वर्षापूर्वी सेबीने म्युच्युअल फंडातील एन्ट्री लोड बंद केले. यामुळे दलालांचे कमिशन कमी झाले. एकूण दलालांच्यापैकी ५० टक्के दलालांनी आपला व्यवसाय बंद केला. अशा मोठ्या बदलांना सामोरे जाण्यासाठी आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर नवीन शिक्षण आवश्यक असते. या शिक्षणाचा खर्च गुंतवणूक म्हणून पहावा ज्या योगे पुढे आपले उत्पन्न वाढू शकते.

**आरोग्य** - आपले आयुर्मान दिवसेंदिवस खूप वाढत आहे. आज ८०-८५ वयाचे धट्टेकट्टे ज्येष्ठ आपणांस सहज नजरेस पडतात. या हिशोबात आजची तरुण पिढी सहज १२५ ते १३० वयापर्यंत बॅटींग करू शकेल. त्या वेळेस त्यांची मुले ९०-९५ वयाची व नातवंडे ६०-६५ वयाची असतील. असे झाल्यास मिळवलेला पैसा उपभोगण्यासाठी शरीर धडधाकट नसेल तर सर्व पैसा वैद्यकीय इलाजांवर खर्च होईल. यापुढे शस्त्रक्रिया व उपचार इतके महाग होतील की सर्व सामान्यजनांच्या खिशाला परवडणार नाही. वैद्यकीय विम्याचे हप्ते वाढत जातील. याला पर्याय - शरीर धडधाकट रहाण्यासाठी गुंतवणूक करावी लागेल. ही गुंतवणूक फक्त पैशांची नसून वेळेचीसुध्दा असेल. रोज जिम किंवा योगासने किंवा तत्सम इतर व्यायाम प्रकारासाठी वेळ बाजूला काढून ठेवावाच लागेल. आज दहा तास ऑफिसचे काम, तीन-चार तास जाण्यायेण्यात गेले. घरी आल्यावर एखादी टिव्ही सिरीयल पाहिली की दिवस संपतो. ह्या गणितात मुलांना द्यायला वेळ नसतो तर सकाळी लौकर उठून व्यायाम करणे इंपॉसिबल! पण ही चतु:सुत्री अवलंबली तर खऱ्या अर्थाने आपण श्रीमंत होऊ.

(लेखक सेबीकडे नोंदणीकृत गुंतवणूक सल्लागार आहेत)



**जयंत विद्वांस**
9892202011
jayantvidwans61@rediffmail.com



## थोडे को…

### नाटक …नाटक …नाटक

१. □□□
या मूळ नाटकावरुन वसंत कानेटकरांचं ‘बेईमान’ हे नाटक लिहिलं गेलं.

२. □□□ □□□ □
जयवंत दळवींच्या ‘महानंदा’ कादंबरीवरचं नाटक शं. ना. नवरे यांनी लिहिलेलं.

३. □□□□ □□ □□
नाणावटी खून खटल्यावर आधारित नाटक

४. □□□□□
जी. ए. कुलकर्णी यांच्या ‘प्रदक्षिणा’ या कथेवर शन्नांचं नाटक

५. □□□□□
‘अथांग’ या कादंबरीवर आधारित जयवंत दळवींचं नाटक

६. □□ □□ □□
नृत्यनाट्य ज्यातून काम केलेल्या अनेक मराठी मुली अभिनेत्री म्हणून उदयाला आल्या.

७. □□□□ □□□
बाळ कोल्हटकरांचं नऊ अक्षरी नसलेलं ‘एखाद्याचं नशीब’ सोडून दुसरं नाटक

८. □□□□□
राम गणेश गडकरी यांचे अपूर्ण नाटक

९. □□□ □□
आचार्य अत्रे लिखित ‘किंग लियर’

१०. □□ □□□□ □□□
मंगेश पत्की यांनी लिहिलेलं डॉ. श्रीराम लागू, जयराम हर्डीकर अभिनित नाटक

११. □□□□ □□□
‘वेगळं व्हायचंय मला’चं मूळ नाव, जे नऊ अक्षरी नाही म्हणून बदललं

उत्तरे : १.बेकेट २.गुंतता हृदय हे ३.अपराध मीच केला ४.रंगसावल्या ५.महासागर ६.दुर्गा झाली गौरी ७.मुंबईची माणसं ८.राजसंन्यास ९.सम्राट सिंह १०.राव गुरुदेव मार्तंड ११.विभक्तीचा प्रत्यय

# मी, तो आणि ती (मेट्रो)

- अनिल हर्डीकर

बंड्या तिरके माझा वर्गमित्र. आम्ही सोबतीनं पास झालो, नापास झालो. बंड्याबद्दल म्हटलं तर खूप सांगता येईल पण चारचौघात सांगण्यासारखं काहीच नाही. ह्याचं डोकं म्हणजे बुद्धिबळाच्या डावातला ऊंट. त्याचे आडनाव 'ऑड नाव' वाटत नाही अशी त्याची विचारपध्दती आहे. वर्गात एकदा मास्तरांनी विचारलं, 'आगगाडी आली की रेल्वेचे फाटक बंद कां करतात?' बंड्या म्हणाला, 'गाडी गावात शिरायला नको म्हणून'.

अशी निरुत्तर करणारी उत्तरं देत बंड्या मोठा झाला वयानं. बंड्याच्या बापानं बंड्यासाठी भरपूर माया जमवली आणि बंड्याच्या उर्वरित आयुष्याची बेगमी करून इहलोकीची यात्रा आवरली.

बंड्या परवा अचानक भेटला. काहीतरी विचारायचं म्हणून म्हणालो, 'काय रे, कुठून येतोहेस?'

'घाटकोपरहून'- बंड्या.

'घाटकोपरहून? काही विशेष?'-मी

'त्या तुमच्या मेट्रोची खूप कौतुकं वाचली... म्हटलं पाहू या' - बंड्या

'आवडली कां?' मी होकाराच्या उत्साही अपेक्षेने विचारलं.

'चक' बंड्यानं नकारार्थी मान हलवली.

'काय? आवडली नाही?' मी अविश्वासानं विचारलं .

'न आवडायला कारण काय?' - मी.

''आवडायचं एक सांग, मी न आवडायची दहा कारणं सांगतो'' बंड्यानं मला चॅलेन्ज केलं.

''कमाल आहे'' मी दोनच दिवसापूर्वी मेट्रोनं प्रवास केल्यामुळे मेट्रोवर बेहद खूष असल्यानं सहज म्हणालो.

''अत्यंत गैरसोयीची आहे आणि वाह्यात खर्च केलाय'' बंड्या म्हणाला. मला त्या विधानावर काय बोलायचं ते न कळल्यामुळे मी गप्प बसलो. बंडूच म्हणाला, ''वेस्टर्न किंवा सेंट्रल किंवा हार्बरसारखी ही रेल्वे आपल्या बापाची वाटत नाही. यह भारतीय रेल की संपत्ती है, असा प्रेमळ आश्वासक आनंद नाही त्यात!, दुसरी गैरसोय म्हणजे विनातिकीट प्रवास करता येत नाही''.

''अरे पण मूर्खा, अम्बानीचं घर आणि रेल्वे चालणार कशी?'' असं विचारावसं वाटलं पण बंड्यापुढं गीता कोण वाचणार? तोच क्षणभर थांबून बंड्या म्हणाला, ''मी असं म्हणत नाही की प्रत्येकानं दरवेळी तिकिट न काढता प्रवास करावा. पण कधीकधी घाई असेल, तिकिटासाठी पैसे नसतील, क्वचित कधी सुट्टे पैसे नसतील तर?...निदान त्यावेळी तरी विनातिकिट जाण्याची सोय हवी की नाही?''

माझ्या लहानपणी माझा गावचा काका तर विदाऊट तिकिट हा तिकिटाचाच एक प्रकार आहे असं समजून तिकिट बारीवर 'एक गिरगावसाठी विदाऊट तिकिट द्या' असं म्हणाल्याचं माझ्या ऐकण्यात आलं होतं.

बंड्याला म्हणालो, ''मेट्रोमुळे वेळ वाचतो हे तर कबूल करशील?''

तोही मुद्दा बंड्यानं मोडीत काढला, ''कसल्या वेळ वाचण्याच्या गप्पा मारतोस? एकवीस मिंट टोकनाच्या लायनीत उभा होतो...''

''पण पुढच्या एकवीस मिनिटात पोहचलास ना घाटकोपरला?'' मी विजयी मुद्रेनं म्हणालो.

''...पण विदाऊट तिकिट जायची सोय असती तर?'' बंड्या मेट्रोचं कौतुक म्हणून करायचं नाही असं धरून ठरवून आला असावा. मी म्हणालो, ''तुझा रिलायन्सवर राग आहे कां?''

''मुळीच नाही, तो त्याच्या ह्यानं चार पैसे मिळवतोय. मिळू देत. मी जे मेट्रोविषयी विरोधात बोलतोय ते आमच्या पश्चिम, मध्य, हार्बर मार्गापेक्षा तिथे किती गैरसोयी आहेत ते




जाणवते म्हणून बोलतोय.''

''गैरसोयी?'' मी उच्चरवे म्हणालो.

''होऽय, गैरसोयी आणि वाह्यात खर्च'' बंड्यानं माझ्या आवाजाच्या वरची पट्टी लावली, ''तू गेला आहेस कधी?'' बंड्यानं विचारलं. मी खरं बोलावं की खोटं या संभ्रमात असताना माझ्या उत्तराची वाट न बघता बंड्यानं संवाद पाण्यासारखा वहाता ठेवला....''बघ, तुझ्या मेट्रोची स्टेशनं फलाट एवढे चकाचक की पान खाणाऱ्याची पंचाईत होते. त्यानं थुंकायचे कुठे?''

माझा संयमाचा बांध फुटला, ''सार्वजनिक ठिकाणी थुंकणं चांगलं आहे कां?'' ''मग काय दरवेळी घरी जाऊन थुंकायचं पान खाणाऱ्यानं?'' बंड्याचा युक्तिवाद.

''मी म्हणतो पान खाऊच नये मुळात'' मी.


''मी म्हणून ऐकलं, चारचौघात बोलू नकोस. पान खाणं ही राष्ट्राची संस्कृती आहे. आज शहरामध्ये कानाकोपऱ्यात लाल रंगाचं जे वैभव आहे ते पान खाणाऱ्यांनी जातायेता वाढवलेलं आहे. राजे महाराजे गेले पण ह्या पानांच्या गाद्यामुळे राष्ट्रात...'' बंड्या बोलत असताना मी बंड्याला अडवलं, म्हटलं ''मुद्दा मेट्रोचा आहे.'' ''ओके, रुळावर येतो. मेट्रोला कुठे आहेत म्हणा'' बंडया म्हणाला. ''आत्महत्या करणं गुन्हा आहे. कबूल! पण किती तरी जीवांनी जगणं झुगारून जेव्हा मृत्यूला कवटाळायचं ठरवलं तेव्हा रेल्वेच्याच रुळांनी त्यांना मुक्ती दिलीय. विषामध्येही भेसळ असल्यामुळे आणि शेवटच्या क्षणी रिस्क कां घ्या ह्या विचाराने कैक विचारी माणसांनी...''

बंड्याला रुळावर ढकलावा असा विचार माझ्या मनात आला. मात्र प्रत्यक्षात मी म्हणालो, ''बंड्या, तुला मेट्रोचं काहीच आवडलेलं दिसत नाहीये''.

''असं कसं! सौंदर्यदृष्टी मला आहे की, मी मला काय आवडलं ते सांगतो पण नंतर...'' काही तरी मेट्रोचं बंड्याला आवडलं आहे याचा मला आनंद झाला. म्हटलं, थोडा वेळ बंड्याला सहन करावं.

''देशात पोलीस काय कमी आहेत?'' - बंड्या.

''म्हणजे ?''
''पण इथे सुरक्षा रक्षक. तुझ्या मेट्रोत'' -बंड्या.
लोकसभा निवडणूकीपूर्वी दोन घटकांमध्ये देश वाटला गेला होता मोदीचा आणि राहुलबाबाचा. इथे बंड्यानं मला 'मेट्रोचा माणूस' केला होता आणि स्वत:कडे स्वयंघोषित मध्य, हार्बर, पश्चिम रेल्वेचे प्रवक्तापद घेतलं होतं.
''मेट्रो स्थानकावर पोलीसांच्या जागी सुरक्षा रक्षक त्यामुळे 'काय द्याचे' काही चालणार नाही ते शिट्या, लाठ्या मारणार. भारतीय जनतेवर ते अविश्वास दाखवतात. सर्व प्रवाशांची चाचपणी, कुठे कुठे हात लावतात ?'' - बंड्या.
''हल्लीच्या दिवसात अतिरेकी हालचाली'' - मी.
''मेट्रोच्या सुरक्षा रक्षकांचं वागणं अतिरेकी नाही कां ?'' - बंड्या.
मी विषय बदलायच्या हेतूनं बंड्याला म्हणालो ''या एवढ्या हॉट टॉपिकवर बोलायचं असेल तर सोबत चहा हवा असं नाही वाटत तुला ?''
''हवा, थँक यू, हवाच. स्वच्छ हवा ही प्रवाशांची साधी मागणी मेट्रोनं वातानुकूलित होऊन फेटाळली. दारात उभे राहून वाटेवरची सौंदर्यस्थळे पाहण्याच्या तरुणांच्या आणि मनानं तरुण राहिलेल्या म्हताऱ्यांच्या आशा धुळीत मिळाल्या. बैठ्या आणि मैदानी खेळांच्या पलीकडे जाऊन दारात उभं राहून रस्त्यावरच्या धावत्या खांबांना हात लावणे, टपावर जाणे, खिडकीतून आत डोकावणे हे जे मर्दानी खेळ तरुण पिढीने क्रीएट केलेत, डिझाईन केलेत त्या खेळांना मेट्रोत कसे आणि कुठून प्रोत्साहन मिळणार ?''. ''जीवघेणे प्रकार आहेत ते'' मी म्हणालो. ''वा! तसा रेल्वेचा रोजचा प्रवासही आहे आहेत की'' बंड्या म्हणाला. आम्ही चहाच्या टपरीवर पोहोचलो होतो. पाण्याचा एक घोट घेत बंड्या म्हणाला, ''भारतीय संगीत हे जीवनात तळागाळापर्यंत पोहोचलं आहे. ज्यांना तुम्ही आम्ही भिकारी म्हणून हिणवतो अशा कलाकारांनी रेल्वेच्या माध्यमातून सर्वधर्मसमभाव घाऊक प्रमाणात....''
''काय भसाड्या आवाजात गातात ते..... त्यांनी गाऊ नये म्हणून प्रवासी आठ आणे रुपया भीक घालतात'' - मी.
''तेच तर त्यांचे talent आणि creativity'' - बंड्या .
''डोंबलाची creativity'' - मी.
''अरे, ते चांगल्या आवाजात गायला लागले तर कोण भीक घालेल त्यांना ? सगळे गाणी ऐकत बसतील आणि जातील दोन तीन स्टेशनं पुढे. तू मला सांग, तुझ्या ह्या मेट्रोत ह्या शिर्डीवाल्यांना काय स्थान रहाणार आहे? ह्या चालत्या फिरत्या संगीतसभा नामशेष पावतील. भजनी मंडळांचा तर मेट्रोनं विचारच केला नाही. देवांच्या तस्विरी लावायची काही तरी प्रोव्हिजन नको ? बरं, केलं सुरू भजन तर टाळ काढून नमनाचा अभंग होण्यापूर्वीच घाटकोपर येणार. लेडीज डबा नाही. भाज्या निवडणार कुठे ? त्यांनी फॅन्सी दागिने, रबर, पीना घ्यायला काय दुकानात जायचं ? लगेजचा डबा नाही. खरं तर प्रवासी संघटनांनी लगेच कम्प्लेंट करायला हवी. हे पेन पाह्यलंस ?'' - बंड्या.
''रेल्वेत मिळतं'' - मी म्हणालो.
''मेट्रोत नाही. उदबत्त्या, सूया, बॉलपेनं, स्क्रू ड्रायव्हर, हातोड्या, ब्याटऱ्या, अंकलिपी, मुलांची रंगवायची पुस्तकं...सगळं''. - बंड्या.
''मेट्रोचे डब्बे किती छान दिसतात'' - मी.
''तो चष्मा चांगला ज्यानं वापरणाऱ्याला चांगलं दिसतं. जो वापरणाऱ्याला चांगला दिसतो तो महाग असतो'' - बंड्या.
''काचेच्या खिडक्यांतून बाहेरची दृश्य बघता येतात की...'' - मी .
''पण दरवाजातून डोकावता येत नाही. आणखी एक, फलाट आणि डबा एकाच लेव्हलला. चढण्या उतरण्यातला आनंदच गेलाय'' - बंड्या.
''बंड्या, चढण्याउतरण्यात कसला आलाय आनंद ?'' - मी.
''भारतीय रेल प्रवासातील त्या दोन महत्वाच्या स्टेप्स आहेत. एकदा तू डब्यात चढलास की तुला घेऊन जायचं काम तुझ्या पाठीमागे असलेले १०० प्रवासी करतात आणि उतरताना दरवाजापर्यंत नेण्याचं काम मागे उभी प्रवासी संघटना करते. उतरताना तुलाच पाय उचलून फलाटावर जावं लागतं'' - मीही हरायचं नाही, शरण जायचं नाही असं ठरवलं होतं.
''बंड्या, एस्कलेटर्स ही सोय नाहीये ?'' - मी.
''सोय नव्हे, आलस्यवर्धक आहेत ही यंत्रे'' - बंड्या.
मी चिडलो. म्हणालो, ''बंड्या, तू दोन्हीकडून बोलतोस''. बंड्या म्हणाला, ''हा मुद्दा इलॅबोरेट नंतर करतो. पहिल्यांदा दुसरा मुद्दा घेतो. मेट्रोतून प्रवास करून ज्ञानवर्धन होणार नाही. पश्चिम मध्य हार्बर रेल्वेवर कितीतरी माहितीपत्रके असतात, पाणपोया आहेत ज्ञानाच्या. ३०० रुपयात पॅन कार्ड देणार कोण ? डोकेदुखी अंगदुखीच्या गोळया, कोणत्या ? मुले पाहिजेत अशा कंपन्यांचे contact numbers आणि मुले नसतील आणि व्हायला हवी असतील तर खात्रीनं देणारी सेंटर्स सारं काही ज्ञान होतं रेल्वेच्या प्रवासात विना प्रयास''.
''बेमूर्वत, उध्दट रिक्षावाल्यांना अद्दल घडली हे तर मान्य करशील ?'' मी हुकमाचा एक्का काढला.
''वाईट वाटलं'' - बंड्या.
''कशाचं ?'' - मी.
''तू परप्रांतियांना शिव्या घातल्यास ह्याचं''- बंड्या.
''मी रिक्षावाल्यांना म्हणालो आणि बाय द वे ह्या शिव्या नसून त्यांचे गुणविशेष आहेत'' - मी.
''नीट ऐक, समजून घे, मराठी रिक्षाचालक 'अप टू स्टेशन नो टेन्शन' या तत्त्वावर 'गाडी' चालवतात. 'कुठलंही भाडं' घेणारे रिक्षाचालक परप्रांतीयच असतात. त्यांना उध्दट का म्हणतोस ?'' - बंड्या
''ते आपलं भाडं नाकारतात'' - मी
''वेडा आहेस तू, घटनांकडे वेगळ्या नजरेनं बघ. आपल्याला जिथे जायचं असतं तिथे त्यांना जायचं नसतं. तुला त्यांच्या मार्गावर जायचं असेल तर ते कधी नाही म्हणणार नाहीत, परोपकारी आहेत ते.'' - बंड्या
एव्हाना चायवाल्या पोरानं कटींगचे ग्लास हाती दिले होते.
''बरं, बाकी सगळं जाऊ दे, तुला मेट्रोत आवडलेली गोष्ट सांगणार होतास. ते राहिलंच'' - मी म्हणालो
''सांगतो, तू गेला आहेस मेट्रोनं ?'' - बंड्या .
''म्हणजे काय'' - मी .
''कुठून गेलास ?''- बंड्या.
''त्याचा काय संबंध'' - मी.
''वर्सोवा तिकिट विन्डोवर टोकनं देतात त्या खिडकीवरच्या एका पोरीनं माझ्या दिलाची गाडी 'टो' केल्येय'' - बंड्या.



**-अनिल हर्डीकर**
स. क्र. ५२७० | **9819421858**
hardikarsutradhar@gmail.com

## घेण्यासारखं

**- सौ. स्वाती लोंढे**

शोभा ही तिच्या वयाच्या दहाव्या अकराव्या वर्षी बारीक सारीक कामं करायला म्हणून यायला लागली. माझी मुलंही त्याच वयाची असल्यामुळे तिला कधी नोकर अशी वागणूक तर दिली गेली नाहीच पण उलट पाचच्या आत नंबर येणाऱ्या माझ्या मुलांना बक्षिस कबूल केलेलं असूनसुद्धा दरवर्षी मी ते शोभाच्या समोर देऊ शकत नसे कारण ती दोन वर्षांनी एकदा पास व्हायची. मग ज्या वर्षी ती पास व्हायची तेव्हा सगळ्यांचा बक्षिस समारंभ रुबाबात साजरा व्हायचा. आज तिची चाळिशी जवळ आली. मधली तिच्या बाळंतपणाची काही वर्षे सोडल्यास ती आमच्याकडे येतच राहिली. पण आज इतक्या वर्षात सोफ्यावर 'बस' सांगून सुद्धा ना कधी ती सोफ्यावर बसली किंवा ना कधी अगदी बरं वाटत नसून सुद्धा ती चटईवर आडवारली. उपजतच सेवाभावी वृत्ती अंगी असलेली...कधीही उलट उत्तरं न देणारी..अतिशय भोळी ...हिशोबाशी काही देणं घेणं नसणारी आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे तोंडचा घास दुसऱ्याला भरवणारी. कारण तिचं असं प्रामाणिक मत आहे की ती गरीब नाहीच आहे पण उलट तिच्यापेक्षा खूप गरीब माणसं तिच्या आजूबाजूला राहतात.



लग्नानंतर ती आमच्याकडे साड्या नेसून यायला लागली. म्हणून मी तिला माझ्या अगदी चांगल्या २-३ साड्या तिला दिल्या. त्या देताना म्हटलं,

''अगं, नुकतंच लग्न झालेली नवी नवरी तू आहेस नां, मग उद्यापासून ह्या साड्या नेसून ये बघू.''

८-१० दिवस झाले पण एकदाही तिनं मी दिलेल्या साड्यांपैकी साडी नेसलेली आढळली नाही. आणि एक दिवस ती नेसलेली साडी फार नाही, पण फॉलजवळ थोडी फाटकी दिसली. म्हणून मी तिला विचारलं, ''शोभा, अगं मी दिलेल्या साड्या तू कां नेसत नाहीस? तुला त्या आवडल्या नाहीत कां... ?''

''नाऽही. तसं नाही ऋचाची अम्मा (माझ्या मुलीचं नाव ऋचा असल्यामुळे ऋचाची अम्मा हे तिनं माझं अगदी पहिल्या दिवसापासून केलेलं नामकरण) काय झालं माहित्येय? माझ्या शेजारच्या झोपडीत नव्यानं राहायला आलेली बाई नां, खूप गरीब आहे हो..,तिचा नवरा हल्लीच गेला आणि दोन लहान मुलं आहेत तिला. आणि अजून तिला कामं पण नाही मिळाल्येत. कसं आणि काय जेवायला घालणार ती पोरांना.. मला तिची खूप दया येते हो. ती परवा बाहेर निघाली होती आणि तिची साडी इतकी फाटली होती, रागावू नका ऋचाची अम्मा. मी तुम्ही दिलेल्या साड्यांमधली एक साडी तिला दिली. आणि बसने जायला दहा रुपये पण....''

मी या तिच्या लॉजिकने भारावून गेले तर पुढे ती म्हणाली, ''दुसऱ्याला दिलं की आपल्याला समाधान मिळतं असं तुम्हीच मला शिकवलंत नां?''

मला माझीच लाज वाटली. कारण मी शोभाला दिलेल्या साड्या मला निरुपयोगी झाल्या म्हणून दिल्या होत्या आणि तिनं मात्र तिला उपयोगी असणाऱ्या स्वत:ला नेसता येणाऱ्या साड्या ती बाई आपल्यापेक्षा गरीब आहे ह्या विचाराने देऊ केल्या होत्या.

संध्याकाळी नवऱ्याला या एपिसोडचं वर्णन करीत म्हटलं,

''शोभाकडून सुद्धा खूप काही घेण्यासारखं आहे नां!''



-
9869449209

## असा कसा हा संसार?

असा संसार-संसार, कलीयुगाचा संचार
नसे शाश्वती जीवाची, मनावरी सदा ताण ।

असा कसा हा संसार, नियतीही खेळे खेळ
अतिवृष्टी करी बेजार, कधी कोरडा दुष्काळ ।

असा बेकार संसार, क्षणोक्षणी अपघात
जागोजागी बॉम्बस्फोट, काळ्या बाजाराला ऊत ।

असा नकोसा संसार, सत्य गेले ढगाआड
असत्याच्या बळावर, बंगले-माड्या सजतात ।

असा संसार-संसार, टी व्ही व्हिडीओचा घोळ
बाळ अभ्यासात सुस्त, शिक्षणाचा बट्ट्याबोळ ।

असा अन्यायी संसार, खऱ्याला न मिळे न्याय
सज्जनाला होई शिक्षा, चोर सुटे आरामात ।

असा कृत्रिम संसार, चित्रपट-मालिकांचा कळस ।
नंगेनाच पाहुनिया, मनी येतसे किळस ।

असा टाकाऊ संसार, व्यसने आणि भ्रष्टाचार
अराजकांचा हा राक्षस, कधी कोण मारणार ? ।

असा स्वार्थी हा संसार, ज्याला त्याला पैसा प्रिय
नाती-गोती विसरला, कोण बाप आणि माय ।

असा कोता हा संसार, कोठे लपलासी देवा ?
नाही सोसवत आता, तुची होशी अमुचा त्राता ।

**शुभदा कुळकर्णी**
**25240512**



# मागे एकदा

## देवदूत

**- रश्मी रमाकांत ठोसर**

साधारण २००५ मधील गोष्ट आहे. दुपारची ३ ची वेळ होती. पगार काढण्यासाठी बँकेत गेले. काहीतरी कामासाठी पॅनकार्ड लागतंच, या विचाराने चेकबुक, पासबुक यांची छोटीशी बॅगच सोबत घेतली. पगाराची रक्कम व्यवस्थित बॅगेत ठेवली. घरी जाण्यासाठी बस पकडली. पूर्ण महिनाभर कष्ट केल्यावर मिळणाऱ्या पगाराची महती सर्वांनाच ठाऊक आहे. माझेही तसेच होते. पगार मिळतो कधी, घरखर्च भागवते कधी अशी परिस्थिती होती. नेहमीप्रमाणे ५०० रुपयांच्या १० नोटा, १०० रुपयांच्या १० नोटा व्यवस्थित ठेवल्या व आनंदाने घरी आले.

पगाराचा दिवस म्हणजे मुलांना आनंद देण्याची पर्वणी जणू. घरी आल्याबरोबर पर्स कपाटात ठेवली. आज काहीतरी हॉटेलमधून ऑर्डर करु असा विचार आला आणि मला आठवण झाली की आज पगाराची रक्कम देवासमोर ठेवायला विसरले. पटकन् उठले व पर्स काढली. पर्समध्ये छोटी बॅगच नव्हती. सर्व पर्स उलटी पालटी केली, पण छे... मेंदू एकदम हलला. डोळ्यापुढे घेरी आल्यासारखे झाले. कुठे गेली बॅग? थोडा



वेळ शांत बसले. सगळ्या देवतांची नामावली म्हणून झाली. पण मी तर आल्याबरोबर पर्स कपाटात ठेवली होती. त्यामुळे दुसऱ्या कुठल्याच शक्यतांचा विचार केला नाही. वेडीपिशी झाले. काहीच सुचेना. मार्ग दिसेना.

दुसऱ्या दिवशी सकाळी बँकेत धाव घेतली. म्हटलं, काउंटरवरच विसरली असेल. कोणी जमा केली असेल तर.. एक ना दोन.. वेडी आशा.. पण सर्वच फोल... खूप उलट सुलट प्रश्न मनाला विचारुन बघितले. सर्व निष्फळ.

४-५ दिवस झाले. जेवणखाण सुचेना. आजारपण आल्याप्रमाणे झाले. मन कशातच रमेना. असं वाटलं की माझं आयुष्यच हरवले आहे. एवढा मनस्ताप झाला. स्वत:चाच राग येऊ लागला. मी ही गोष्ट माझ्या जवळच्या मैत्रिणीला सांगितली. ती माझ्या बाजूलाच राहते. झालं...

८ दिवस झाले. मी काही निमित्ताने माहेरी (डोंबिवली) गेले होते. आईजवळ गप्पा मारत बसले होते. तेवढ्यात फोन वाजला, हॅलो, मैत्रिणीचा आवाज आला.

''अगं रश्मी, तुझी हरवलेली बॅग मिळाली.'' ऐकून मला हर्षवायू होईल असं वाटलं.

''कशी, कुठे, कोणी... ???''

अनेक प्रश्न. वाटलं पंख असते तर क्षणार्धात घरी पोहोचले असते. माझ्या मैत्रिणीला माझी अगतिकता चांगलीच ठाऊक होती. ती म्हणाली, ''अगं हो हो, माझ्या ताब्यात तुझी वस्तू आहे. शांत हो.''

''अगं बघ, सर्व नोटा, पासबुक, चेकबुक, पॅनकार्ड..''

''अगंबाई, सर्वच आहे व तुझ्या हस्ताक्षरातील एक रेसिपी लिहिलेले बसचे तिकीटही आहे.''

मी मनातल्या मनात त्या अनामिकाचे आभार मानले. मैत्रिणाला धन्यवाद दिले. देवापुढे साखर ठेवली. लगेचच दादर गाठले. येईपर्यंत दीड तास लागला. तेवढ्या वेळात नाना विचार येऊन गेले. कोण असेल ती व्यक्ती..काय नाव असेल, ओळखीची असेल की अनोळखी, काय बक्षिस देऊ की नुसतेच आभार मानू..एक ना अनेक. धावतच मैत्रिणीकडे गेले. तिने सर्व सांगितले व बॅग माझ्या हातात ठेवली. ऐकून डोळ्यातून पाण्याच्या धारा व मनांत विचारधारा... कोण अनामिक होता तो..

ती म्हणाली, ''अगं तो तुझ्याच घरी खोली नं. ९६ इथे गेला होता पण तुझ्या दाराला कुलुप. शेजाऱ्यांनी सांगितले, खोली नं. ८६ मध्ये चौकशी करा. म्हणून तो माझ्याकडे आला. मला म्हणाला, मी डंबे. हे प्लीज रश्मी ठोसरना द्याल कां?''

''काय आहे हे पहायच्या आधीच मी 'हो'म्हटलं. (मीही तुझी बॅग हरवल्याचे विसरलेच होते). काहीतरी ऑफीसच्या कामाचे असेल म्हणून पहात होते. तोपर्यंत तो अनामिक पाठमोरा जाताना दिसला. पुढे जाईपर्यंत ३ जीने सरसरत निघूनही गेला. पाणीसुद्धा प्यायला थांबला नाही. मी पण खूप गोंधळूनच गेले होते.'' वगैरे ती पुढे बोलतच होती. पण माझ्या मनात दुसरेच विचार चालू होते. मी तर त्याला पाहिलंही नाही. पण जे कोणी सामान्य होते ती व्यक्ती माझ्यासाठी असामान्यच होती. नाही नाही, माझ्यासाठी देवदूतच होती.

**- रश्मी रमाकांत ठोसर**

★★★

**आगामी कार्यक्रम**

## सामुदायिक व्रतबंध

**बुधवार दि. ६ मे २०१५ रोजी**
**सकाळी ११ वा. ३ मि.**
**या सुमुहूर्तावर सामुदायिक व्रतबंधाचे आयोजन केले आहे.**
**नावनोंदणी सुरू आहे.**
**अधिक माहितीसाठी मंडळाच्या कार्यालयात संपर्क साधावा.**

★★★

The END

कथापूर्ती

# अरे संसार संसार...

-अरविंद परचुरे

माझ्या नेहमीच्या सवयीप्रमाणे सकाळी ७ वाजता उठलो. पेपरवाल्याने पेपर टाकलाच होता, तो घेतला आणि नेहमीप्रमाणे गॅलरीत जाऊन वाचत बसलो. रविवार होता. तसं म्हटलं तर नोकरीतून निवृत्त झाल्यावर सगळेच दिवस रविवार! पण मनाला लागलेल्या सवयीमुळे आठवड्याचा रविवार उजाडल्यावर जास्त बरे वाटते. तसा दिनक्रमात फारसा फरक पडतच नाही, पण रविवार असल्यावर अमेरिकावासी झालेल्या मुलीकडून किंवा मुलाकडून फोन येण्याची शक्यता वाढते. कारण इंडियातली रविवार सकाळ म्हणजे अमेरिकेत गेलेल्या मुलांची शनिवारची संध्याकाळ असते नां! त्यामुळे, त्या दिवशी तरी त्या मुलांची वीकएन्ड पार्टी किंवा कुठलाही प्लॅन नसेल तर आपल्या इंडियातल्या आईवडिलांशी बोलण्याची, सुखदुःख वाटून घेण्याची संधी त्यांना व आम्हाला मिळते नां!

पेपरवरुन नजर फिरवता फिरवता मनात मुलं, नातवंडं कशी असतील बरं! हे विचार घोळत असतात. मग एखाद्या वेळी फोन खणखणू लागतो. आजही तसंच झालं. एखाद -दुसरा फोन आल्यावर, त्यावर मित्रांशी किंवा नातेवाईकांशी गप्पागोष्टी सुरू होतात तेव्हा घर जागे झाल्यासारखे वाटते, तर कधीकधी बायकोने चहा आणला की, चहा पिता पिता पेपर वाचन होते. पेपरची काही पाने 'सौ' ला द्यावी लागतात. मग स्वयंपाकघरात, काही गॅसवर नसेल व तिचा मूड असेल तर काही विषयांवर चर्चा! कधी कधी काही चर्चांचे रुपांतर वादात होतेही. 'वादे वादे जायते तत्त्वबोधः।' या उक्तीनुसार मीच शेवटी काहीतरी बोध घेतो. वादामध्ये ही जास्त तापणार नाही नां! या विचाराने मीच गॅसवर असतो. तेव्हा मला बहिणाबाईंचा अभंग आठवतो.

**''अरे संसार संसार, जसा तवा चुल्हावर,**
**आधी हाताला चटके, तेव्हा मिळते भाकर''**

दोन्ही मुले भारतात असताना, आम्हा दोघांमधला वाद चिघळला तर, तीच मध्यस्थी करुन आमच्यातला वाद मिटवीत. आमच्या चौकोनी कुटुंबात दोन्ही मुले मोठी झाल्यावर मी अल्पमतात जात होतो. तिच्या बाजूला तीन मते. शेवटी आईच्याच बाजूने पुष्कळदा मुलांची मते पडत. शेवटी बापाला 'बाऽप रे' म्हणून दूर सारलं जाई, असं वाटतं. बापाबद्दल मुलांच्या मनात आदर होताच. पण तो थोडा भीतीयुक्तच! आता दोन्ही मुलांचे अमेरिकेत जाऊन संसार सुरू झाल्यावर ती लहान असताना असणारा माझा दरारा, शिस्त सौम्य झाली. ती दोन्ही मुले त्यांच्या संसारात रममाण झाली आणि आम्हा दोघांचा, आजीआजोबांचा दुसरा डाव (inning) सुरू झाला.

एकेकाळी काही वर्षांपूर्वी मुलांनी भरलेलं, आनंदाने, उत्साहाने, कधी कधी भांडणांनी भरलेलं हे घर कसं शांत, गंभीर वाटायला लागलं, उदास दिसायला लागलं! माझ्या एका कवितेतल्या चार ओळी मला अनेकदा आठवतात...

**''उडून गेली इथली पाखरे,सोडून अपुले घरटे**
**मायबाप ती दुःखित झाली, पाहून घर ते रितें**
**घरात असती बालपणीच्या अनेक त्यांच्या खुणा**
**आठवणींनी भिंती घराच्या रंगुनी जाती पुन्हां''**

नोकरीतून निवृत्त झाल्यावर कविता करण्याचा, कविता वाचन करण्याचा छंद मी जोपासला. कोणालाही उपद्रव न देणारा! आपण ज्यावेळी नोकरीत असतो, त्यावेळी बॉस म्हणून किंवा सहकारी म्हणून आपले ऐकणारे अनेकजण असतात. पण आपल्या निवृत्तीनंतर आपलं ऐकणारे अगदी कमीच! घरातसुद्धा आपलं थोडेफार devaluationच झालेलं असतं. आपलं म्हणणं-मत बायको किंवा मुले ऐकून घेतीलच असं नाही. कारण मुलेसुद्धा आता कमावती झालेली असतात. त्यांनाही मते फुटलेली असतात. आता पैशाकरिताही घर माझ्यावर अवलंबून नसते.

मला आठवतं की मुलं जेव्हा शाळेत शिकत होती तेव्हाची गोष्ट. मुलांना खेळातून घरी या, आता ७ वाजले, घरी यायची वेळ झाली असं सांगायची वेळ झाली की आमच्या बायकोचा माझ्या नावे हुकूम निघे की, ''अहो, मुलांना आता घरात बोलवा, किती काळोख झाला'' आणि मी ती आज्ञा शिरसावंद्य मानून मुलांना एक धपाटा देऊन घरात घेऊन येत असे. मुलं गयावया करत. ''बाबा, तुम्ही असं का करता हो, थोडं १५ मिनिटे आणखी खेळू द्या नां..''असं म्हणत. त्यांच्या विनवणीला न जुमानता मी त्यांना घरात घेऊन येत असे. आता ते आठवलं की वाईट वाटतं. अंमलबजावणी करणारा मी असल्यामुळे मी थोडा वाईट ठरत असे. पण आमची बायको धूर्त! ही कामगिरी माझ्यावरच ठेवी. पण एखादेवेळी लाडू किंवा मुलांच्या आवडीचे पदार्थ केलेले असले की ती स्वतः बाहेर जाऊन मुलांना घेऊन येत असे. माझ्या ते लक्षांत येई, पण बोलणार कसं! मग मनात कवी माधव ज्यूलियन यांच्या कवितेचा ओळ आठवे...

**''प्रेमस्वरुप आई, वात्सल्यसिंधू आई....''**

असा होतो मी 'कामापुरता मामा! ' पण मुलं मोठी झाल्यावर तोपण नाही. पण गमतीने म्हणावंसं वाटतं, 'कामापुरता नवरापण नाही.' आता त्या प्रांतातूनही निवृत्तीचे जीवन.

आजही तसंच झालं. खणखणलेला फोन तिने ऐकला. तो ऐकून चहाचे दोन कप घेऊन ती हॉलमध्ये आली.

''फोन वाजला नं ?'' तिने विचारले.

''हो, बेल वाजली. पण मग थांबली.'' मी म्हटले.

मग तिने सांगायला सुरवात केली, ''वसंता म्हणाला होता की, या डिसेंबरमध्ये बायको-मुलांना घेऊन इंडियात येईन महिनाभर. मला नातवंडांना बघावसं वाटतं हो, सहा वर्षांत आला नाही. येईल ना हो ?''

''अगं, मी काय सांगू शकतो. हे कितवे प्रॉमिस दिलंन तुला? आपल्याला मधून मधून फोन करतो म्हणजे त्याचे आईबाप इंडियामध्ये जिवंत आहेत हे तो मानतो हेच पुरेसे नाही कां?'' मी रागानेच म्हटलं. ''मलाही वाटतं, आपली नातवंडे आपल्या घरात खेळावीत, बागडावीत. हे बघ,

**''घरट्यामधुनी शक्ती घेऊनी**
**पक्षी उडाले आकाशी।**
**विशाल झाले क्षितिज त्यांचे**
**विसरुनी गेले घरट्यासी।''**

हे मी पत्नीला सांगितले आणि तेवढ्यात परत फोन वाजला. तिने फोन उचलला आणि कानाला लावला. वसंताचाच आवाज. ''आई बाबा, तुम्ही कसे आहात?''

''खुशाल. अरे, तुम्ही डिसेंबरमध्ये येणार नां?'' - हिने अधिरतेने विचारले.
''तेच सांगायला फोन केला. मी म्हटलं होतं खरं. पण यावर्षी काही जमणार नाही. तुम्ही दोघं या नां जूनमध्ये इकडे. बरं, ठेवतो गं फोन. जरा घाई आहे बाहेर जायची.'' इति वसंता.

मी ते सर्व  ऐकत होतो. हिला थोडे निराश होऊन पण रागानेच म्हटले, ''आई बाप जिवंत आहेत याची खात्री केलन् नां?'' हिच्या तोंडातून हुंदका बाहेर पडला. मी म्हटलं, ''हे असंच व्हायचं. माझ्या कवितेतल्या शेवटच्या ओळी बघ..

**''पुसता त्यांना येणार कधी ते,**
**उत्तर त्याचे मिळत नसे**
**मायमाऊली दु:खित होऊन**
**समजायचे ते समजत असे''**

''अगं, आपण मुलीच्या, सुनेच्या, त्यांच्या डिलिव्हरीच्या वेळी त्यांच्याकडे जाऊन आलो नां.. आपण त्यांच्यावर संस्कार केले, पण ते कमी पडले. मला वाटतं, ''

**''अरे, संस्कार संस्कार, देई जीवना आकार**
**कापराच्या वडीसम जाई उडुनी सत्वर''**

''अगं, आपले आईवडील कोकणातून मुंबईत आले ते परत गेले कां कोकणात? मग आपल्या मुलांनी तिकडची सुबत्ता सोडून आपल्याकडे यावं ही अपेक्षा कां? तसं म्हटलं तर प्रत्येक माणसाला जास्तीत जास्त चांगलं मिळवण्याची अपेक्षा असते. मीसुद्धा M.Sc. झाल्यावर कॉलेजची प्राध्यापकी पत्करली होती. पण माझी आई म्हणाली, अरे, शिक्षकी पेशातल्या मुलाला तो कितीही हुषार असला तरी लग्नाच्या बाजारात किंमत नाही. चांगल्या मुली त्याला नकार देतात. आईचे सांगणे मला पटले. शिक्षकी पेशाची आवड असूनही मी एका मोठ्या कंपनीत नोकरी पत्करली. थोड्याच वर्षात मी माझ्या हुशारीने मॅनेजिंग डायरेक्टर झालो. यथावकाश एका मुलीशी लग्न होऊन संसार सुरू झाला. आता मुलेही परदेशात गेल्यामुळे परत आम्ही दोघेच, सुटसुटीत संसारातील संध्याछाया बघत.''

असाच एकदा संध्याकाळी गॅलरीत निवांतपणे खुर्चीत विचार करीत बसलो होतो. समोरच्या पिंपळाच्या झाडावर पुष्कळसे पक्षी उडत उडत येऊन आपापल्या घरट्यात विसावत होते. माझं मन भूतकाळात फेरफटका मारुन माझ्या हुशारीचं कौतुक करुन आता भविष्याचा वेध घेत होते. तेवढ्यात ''अहो, चहा आणलाय तो घ्या.'' असं म्हणत माझी पत्नी बाजूच्याच खुर्चीत बसली. शिळोप्याच्या गप्पा सुरु! एवढा संसार यशस्वीपणे पूर्ण झाल्यावर उत्सुकता म्हणून मी तिला विचारले, ''तू मला पसंत केलेस ते माझी हुशारी आणि नोकरी पाहूनच नां?''

पत्नी थोडीशी भांबावूनच गेली  माझा प्रश्न ऐकून. मी परत तोच प्रश्न केला तेव्हा पत्नी सांगू लागली..........''

**-अरविंद परचुरे**
(आ.स.क्र. ८४०) : **25002622**
parchure@hotmail.com

(या कथेचा शेवट करून वाचकांनी पोस्टाने अथवा इमेल द्वारे पाठवावा. अंतिम तारीख २० एप्रिल १५)
E: svayambsm@gmail.com

**जगाच्या पाठीवर कुठेही जा, मात्र**
# ट्रॅव्हल इन्शुरन्स पॉलिसी
**आमच्याकडूनच घ्या**



- वय वर्षे ९९ पर्यंत वैद्यकीय चाचणीची आवश्यकता नाही.
- पॉलिसी ५०,००० डॉलर्सपासून ५ लाख डॉलर्सपर्यंत उपलब्ध.
- आम्ही कोणत्याही इन्शुरन्स कंपनीची पॉलिसी देतो.
- प्रिमियमचे दर अत्यंत माफक
- पॉलिसीची संपूर्ण माहिती, त्याची संपूर्ण सेवा त्वरित देण्याची व्यवस्था करतो.
- आपला काही क्लेम असेल तर आपल्याला संपूर्ण मार्गदर्शन करुन आपली नुकसानभरपाई मिळेपर्यंत सेवा.

**श्री. अनंत पु. गोखले**
भ्रमणध्वनी : **9869526152**
दूरध्वनी : **26832233**

इ-२/७०३, विजयनगर सोसायटी,
स्वामी नित्यानंद मार्ग,
अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०६९.
**email: anant2611@yahoo.co.in**

# नातीगोती

## सुट्टीचा सदुपयोग ?

-गणेश आचवल

नुकत्याच दहावी बारावीच्या परीक्षा संपल्या. एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात शाळांच्या सुध्दा परीक्षा संपत येतात आणि मग तीन महिन्याची मोठ्ठी सुट्टी सुरू होते. सुट्टीत काय करायचं? असा मोठा प्रश्न पालकांपुढे निर्माण होतो. आपल्या मुलांना आणि मुलींना कुठेतरी अडकवून टाकले म्हणजे झाले, असा एक दृष्टीकोन अनेक पालकांचा असतो.


काही वर्षापूर्वीची गोष्ट. शालांत परीक्षा संपल्यावर एक पालक आपल्या मुलाच्या क्लासच्या शिक्षकांना भेटायला गेले आणि म्हणाले,''सुट्टीत करा हो काहीतरी. आमचा



राहुल मराठी माध्यमातला, तुम्ही ना इंग्रजी स्पिकिंगचा क्लास सुरू करा आणि रोज दोन तास शिकवा मुलांना. जून महिन्यापर्यंत चांगले इंग्रजी यायला पाहिजे त्याला. तुमची फी द्यायला आम्ही तयार आहोत''. शाळेत पाचवीत गेलेल्या एका पालकाचा आणखी एक किस्सा. आपली मुलगी किती बिझी आहे, हे ते सांगत होते. ''आमची निशा सुट्टीत कुठेतरी जाऊ या म्हणून हटून बसली होती, पण मी म्हटले, कशाला उगाच पैसे खर्च करा, त्यापेक्षा स्केटिंग शिक, स्विमिंग शिक, छंद वर्गाला जा, तिथे पैसे भरते''असे म्हणून त्या मुलीला पूर्ण अडकवून टाकले गेले. तिचा दिवस सुरू व्हायचा तो स्विमिंगने, तिथून घरी आली की मग ती जायची छंदवर्गाला, मग जेवायला घरी, मग संध्याकाळी स्केटिंगचा क्लास आणि त्यात भर म्हणून पाचवीचा सुध्दा गणिताचा क्लास. निशाला त्यातील काय आवडत होते, माहीत नाही. तिच्या मनाचा किती विचार केला जात होता माहीत नाही. सध्या अभिनय आणि नृत्य या गोष्टीना प्रचंड ग्लॅमर प्राप्त झाले आहे. सुट्टीमध्ये तर 'अभिनय शिका, आमच्या विद्यार्थ्यांना आमच्या प्रोजेक्ट्समध्ये काम करण्याची संधी', अशा आशयाच्या जाहिराती अनेक वर्तमानपत्रातून प्रसिध्द होतात. मालिका, इव्हेंट हे शब्द म्हटले की मुलांपेक्षा पालकांना त्यात प्रचंड रस असतो. आपल्या मुलाला किंवा मुलीला सर्व कला यायला हव्यात, आपले मूल सर्वांच्या पुढे जायला हवे, अशा महत्वाकांक्षा अनेक पालकांच्या असतात. मात्र मुलांच्या मनाचा किती विचार केला जातो? आपल्या मुलाने टिव्हीवर चमकलेच पाहिजे हा अट्टाहास कां? काही वर्षापूर्वी दहावीला एक धडा होता. एका मुलाला बौध्दिक चढाओढ स्पर्धेत पालक जबरदस्तीने भाग घ्यायला लावतात. त्याने त्या स्पर्धेत जिंकलेच पाहिजे असे त्या पालकांना वाटत असते. त्या मुलाला इतरांबरोबर खेळायला पण सोडले जात नाही, टीव्ही पण बघू दिला जात नाही. तो मुलगा ती स्पर्धा जिंकतो आणि ती निवेदिका त्याला प्रश्न विचारते की तुला कोण म्हणून जगायला आवडेल? मुलगा उत्तर देतो, '' मला माझ्या वयाप्रमाणे एक सामान्य मुलगा म्हणूनच जगायचे आहे.....'' सर्व लोक बघत राहतात. स्पर्धा, चढाओढ ही आहेच, पण त्यासाठी आपण या मुलांचे बालपण हिसकावून तर घेत नाही ना? याचा विचार व्हायला हवा.

मला आठवतंय, आम्ही शाळेत असताना सुध्दा शिबिरे होती, पण त्यांचे प्रमाण कमी होते आणि त्या शिबिरात पैसा कमावणे हा उद्देश नसून मुलांना काहीतरी शिक्षण देणे हा उद्देश होता. दुर्दैवाची गोष्ट ही की, सध्या ही शिबिरे (काही अपवाद वगळता) हे पैसे कमावण्याची माध्यमं बनली आहेत. आज पालकांकडे मुलांना देण्यासाठी वेळच कमी उरला आहे. शिवाय आर्थिक दर्जा सुधारल्याने आपल्या पाल्याला आपण मोबाईल, इंटरनेट आणि व्हिडीओ गेम दिला की आपली जबाबदारी संपली, असा दृष्टिकोन झाला आहे. पण मग त्या मोबाईलवर आपला मुलगा किंवा मुलगी नेमके काय करतात, याकडे पालकांचे लक्ष आहे कां? दहावी आणि बारावीत गेलेल्या विद्यार्थ्यांना तर सुट्टीची मजाच घेता येत नाही आणि त्यात जर तुम्ही बारावी सायन्सला असाल तर संपलातच. सकाळी सात ते बारा काय किंवा दुपारी दोन ते नऊ काय, कोचिंग क्लास संस्कृतीत मुले अडकली जातात आणि प्रत्येक शिक्षक सतत 'दहावी' आणि 'बारावी' विषयी उपदेशाचे डोस पाजत असतो. आणि एखाद्या शिक्षकाला जरी असा व्हेकेशन क्लास घेणे मान्य नसेल तरी त्याला ते करावे लागते. नाहीतर व्हेकेशन क्लास घेत नाही म्हणून सुध्दा मुले क्लास सोडून जातात.

लष्करी प्रशिक्षण आणि जंगल ट्रेनिंग ही गेल्या काही वर्षात लोकप्रिय झालेली आणखी एक गोष्ट. जीवावर उदार होणारे काहीतरी खेळ शिकण्यासाठी आपणच पैसे द्यायचे आणि तिथे खरेच शास्त्रशुध्द पध्दतीने ते साहसी खेळ शिकवले जातात का? याचाही विचार करण्याची आज गरज निर्माण झाली आहे. तेव्हा एक सांगावसं वाटतं की, शिबिरांना माझा विरोध नाही, पण त्यात आपल्या पाल्याला घालण्यापूर्वी त्याला किंवा तिला नेमके काय आवडते आणि ते शिबिर विश्वासार्ह आहे ना, याची खात्री मात्र नक्की करून घ्या.



-गणेश आचवल
9833268391
athatharvbharadwaj@gmail.com

# व्हॅ'नीला'

**A BIT REMAINS.....** **-नीला वैशंपायन**

नुकताच एका व्याख्यानाला जाण्याचा योग आला. तिथे एका वक्त्याने सांगितले, 'HABIT' ही अशी गोष्ट आहे, एकदा तुम्हाला चिकटली की चिकटली, मग तुम्ही त्यातून 'H' कमी करा 'A BIT' remains. If you remove 'A' 'from it 'BIT' remains. Still if you remove 'B' from it then too 'IT' remains'अर्थात् जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही. शब्दांचा खेळ एवढेच नाविन्य....!

खरंच माणसांना किती बऱ्या वाईट सवयी असतात ना? अर्थात बऱ्या आणि वाईट हे सापेक्षच.

२४ वर्षांपूर्वी मी जेव्हा LIC मध्ये रुजू झाले तेव्हा आमच्या Personnel Dept मधे पेपर Filing साठी punch करण्याची, कागदाला टाचणी लावण्याची एक पध्दत होती. कागद file करायचा असेल तसा धरून त्याचा बरोब्बर मध्य साधून कागद punch करायचा आणि कागदाला टाचणी लावायची असेल तर टाचणीची टोकदार बाजू दोन कागदांच्या मधे 'च' गेली पाहिजे. तेव्हाचे तिथले अधिकारी याबद्दल एवढे दक्ष होते की, अगदी चितळे मास्तरांच्या एका ओळीत आठ शब्द लिहिणाऱ्या विद्यार्थ्यांप्रमाणे आम्ही तेव्हाची नवी पाखरं सहज ओळखू येत असू. आमची एक कार्यकारी संचालक (E.D.) होते. समोर कोणताही कागद, विशेषत: कॉम्प्युटर स्टेशनरी, त्यांना perforation न फाडलेला कागद अज्जिबात चालत नसे. काही जण perforation तसंच ठेवून कागद फाईल करतात. त्याच्यापुढे असा कागद काढून त्याच perforation फाडून तो परत फाईल करत. समोरचा माणूस स्वत:च्या आळशीपणाला लाजलाच पाहिजे. अजून एक गृहस्थ होते LIC मधे. Revenue Stamp हवा असला की त्यांच्याकडे जायचं. प्रश्न फक्त एक रुपयाचा, पण वेळ अशी असते की तो लाख मोलाचा वाटतो.

आमच्या शेजारच्या एका गृहस्थांना मी एकदा पॉलिश पेपर घेताना पाहिलं. 'काय करत असतील ह्या पॉलिश पेपरने' असा मला प्रश्न पडला होता. माझ्या घरी येणारी बाई मला म्हणाली, ''नारळ फोडायच्या आधी घासतात तो आणि गुळगुळीत करून घेतात ते तुसकण पडू नयेत म्हणून.''

माझ्या एका मावस सासुबाईंची सवय मी आपलीशी केली आहे. नारळ खरवडताना बाजूबाजूनी खरवडायचा, मधेच खरवडायचा नाही. अशाने नारळाचे बाजूने तुकडे निघतात. नारळ खरवडून झाला की शेवटी खवत राहिलं तर करवंटीचे कण नारळात पडू नयेत म्हणून धारधार चमच्यानं खरवडून काढायचा. छान मलाईसारखा नारळ निघून येतो.

वपुंच्याच एका कथेत बायकोला मदत करणाऱ्या एका नवऱ्याबद्दल त्यांनी लिहिलं होतं ''त्याने चटणी वाटली आणि हातासरशी पाटा-वरवंटा धुवून टाकला.'' वपुंच्याच 'ही वाट एकटीची' ह्या कादंबरीतल्या नायिकेला कपडे धुण्यापूर्वी खिसे तपासण्याची सवय असते. स्वत:च्या मुलाचे खिसे तपासताना तिला त्याच्या




वाईट संगतीचा सुगावा लागतो.

सुनीताबाई देशपांडेना वस्तू बांधून येणारे जाड दोरे घरात गुंडाळून ठेवण्याची सवय होती. तसं त्यांनी 'आहे मनोहर तरी' या त्यांच्या चरित्रात नमूद करून ठेवलं आहे.

कुठल्याशा पुस्तकात किंवा लेखात डॉ. गिरीश ओक यांची एक सवय वाचल्याचं आठवतं. ते डब्यांची झाकणं जमवतात. एकात एक बसणारी झाकणं मिळाली की झाली designer डबुकली तयार!! ह्या छोट्याश्या डबीत मग टाचण्या, पिना, लवंग, वेलदोडा अश्या बारीक गोष्टी ठेवायच्या.

रहस्यकथा आणि चित्रपटांच्या दुनियेत तर सवयींमुळे गुन्हेगारापर्यंत पोहोचल्याचे अनेक दाखले देता येतील. चलती का नाम गाडी या चित्रपटातील गुन्हेगाराला गालावरुन हनुवटीकडे रुमाल फिरवण्याची सवय असते. अशा सवयींमुळे गुन्हेगार पकडले जातात.

परवा आमच्याकडे खालच्या मजल्यावरच्या एक आजी आल्या होत्या. काही ठराविक ब्रेडचे packing चे कागद हे मेण लावलेले असतात. ह्या कागदाच्या बोटाएवढ्या लांब सुरनळ्या करून कान्फुटक्या कपात गॅसजवळ ठेवायची त्यांना सवय आहे. कधीतरी लायटर दगा देतो किंवा उदबत्ती/ निरांजन पेटवायला काडी लावायला नको म्हणून उपयोगी पडतात. आता मुलं अमेरिकेत. पाव नाही आणला जात. ओट्यावरचा पाव पाहून मला म्हणाल्या, ''हा कागद टाकू नकोस बरं. तू वापरत नाहीस नां? मी उद्या येईन, मला दे.'' काटकसरीचा भाग सोडा, पण काडी पेटवून इंधन जाळतो आणि हे recycling. हे योग्य म्हणायचं की चळिष्टपणा?

माझ्या मैत्रिणीच्या आईने नुकताच facebook वर फोटो टाकला होता आणि त्याला शीर्षक होतं, 'शेवटची काही उरलेली खूप वर्ष जपून ठेवलेली' आणि फोटो होता पूर्वीच्या काळच्या दुधाच्या बाटल्यांच्या झाकणांचा! ही झाकणं जमवायची त्यांना सवय होती. कशासाठी? लोखंडाची बरबटलेली कढई घासण्यासाठी! वापरायची आणि फेकून द्यायची. स्टील स्क्रबर मधे बरंच काही अडकतं. ते धुण्यात वेळ आणि पाणी खूप वाया जातं.

मला आठवण झाली ती एका मोबाईलवर फिरणाऱ्या message ची. जर्मन मधे घडलेल्या त्या किश्यात वाया घालवलेल्या अन्नाबद्दल. 'money belongs to you but resources belong to the country' अशी समज त्या गिऱ्हाईकाला दिली जाते.

मागच्या आठवड्यात कसलंसं औषध घ्यायला गेले. मुलगा म्हणाला ''आई expiry date बघ'', तर नेमकी expiry date छापलेली होती, तिथलीच गोळी आधी फाडलेली होती. मला माझ्या वडिलांची आठवण झाली. विचार न करता झटकन कृती करणाऱ्यांचा त्यांना भयंकर राग आहे. कुठच्या गोळ्या ठेवायच्या कुठच्या फेकायच्या याचा काही ठराविक काळानंतर आढावा घ्यावा लागतो. पण त्यासाठी expiry date दिसायला तर हवी? कपडे वाळत घालण्याच्या बाबतीतही ते खूपच काटेकोर. कपडे उभे आडवे झटकून दोन्ही टोकं जुळवायची, निऱ्या काढून हातावर थापटून थोपटून दांडीप्रमाणे गट्ठे करून

# व्हॅ'नीला'

ठेवायचे. चालताना कोणाच्याही डोक्याला कपडा किंवा नाड्या लागणार नाही ह्याची काळजी घेऊन वाळत घालायचे. शिवणीचा जाड भाग जास्त हवा लागेल असा वाळत घालायचा. इस्त्रीचा खर्च, इंधन, वेळ, पैसा, सगळं काही वाचेल. असे कपडे वाळत घालण्याबद्दल ते खूपच आग्रही असतात.

एका पुस्तकप्रेमी माणसाकडे मध्यंतरी जाणं झालं. जागेअभावी एका खणात मागे एका रांगेत आणि त्यापुढे एका रांगेत अशा पध्दतीनी पुस्तकं लावली होती. मला एक पुस्तक हवं होतं. कुठे असेल ते विचारलं तर त्यांनी सांगितलं, ''वरून दुसऱ्या खणात मागच्या रांगेत डावीकडून चौथं.'' खरोखर सवयीने पुस्तकं जागच्या जागी लावली होती. पुस्तकं काय किंवा स्वैपाकघरातले डबे, बरण्या काय! अनेक काकू/मावश्या ''डावीकडून दुसरा, उजवीकडून पाचवा'' असं सहज सांगत असतील.

मला आठवतं, Wait Until Dark नावाच्या चित्रपटातल्या आंधळ्या नायिकेला २/३ इंच मागे आलेल्या खुर्चीला अडखळल्यामुळे आपल्या घरात कोणीतरी आलेलं आहे, हे कळतं. घरात शिरलेल्या शत्रूशी लढताना तिच्या सवयी हेच तिचं अस्त्र बनतं. कुठे काय आहे ते शत्रूला उजेडातच कळणार म्हणून ती काठीने दिवा फोडून टाकते आणि अंधार करून अखेर जिंकते.

नेटकेपणा एकदा अंगात भिनला की त्याचीही सवय होऊन जाते. दुसऱ्याने कसंतरी काहीतरी केलेलं चालत नाही, तेव्हा ते त्रासदायक बनतं आणि मग ती चांगली सवय, कामाची पध्दत ही त्या व्यक्तिची ओळख ठरते. एकदा अशी ओळख झाली की माणूस स्वतःच्या ओळखीबाबत अधिकच आग्रही बनतो.


नुकतंच youtube वर महात्रेय यांचं एक व्याख्यान ऐकलं. त्यात त्यांनी जगातल्या ५०० यशस्वी व्यक्तिमत्वामधला एक समान गुण अधोरेखित केला आणि तो म्हणजे सर्वोत्तमाचा ध्यास!



'जे करू ते सर्वोत्तम' अशी सवयच एकदा लागली तर मग काम छोट्टसं असो वा महाकाय....

-नीला वैशंपायन
9920329214
wneela2gmail.com

'IT REMAINS ..... '




अलिकडील जीवनशैलीतील बदल, आहार, विहार व मनःस्वास्थ आदि कारणांमुळे रोगांची संख्या वाढलेली दिसून येते. रोज नवनवीन व्याधींची भर पडत आहे. असे असले तरीही रोगाचे समुळ उच्चाटन होण्यासाठी व दीर्घायू प्राप्तीसाठी निरोगी समाज निर्माण होण्याच्या दृष्टीने विचार होणे आवश्यक आहे. रोग होऊ न देणे हे उपचारापेक्षा श्रेष्ठ आहे.

याच दृष्टिकोनातून आम्ही पुढील अंकापासून वैद्य सुभाष मार्लेवार, एम.डी. आयु.(राष्ट्रीय समुपदेशक, आयुर्वेद - योग - अध्यात्म) यांचे आरोग्यविषयक सदर सुरू करीत आहोत.

त्यामध्ये - १. आयुर्वेद परिचय - धातू विचार, पंचमहाभूत विचार २. ऋतूचर्या ३. दिनचर्या ४. रात्रीचर्या ५. आहाराचे नियम ६. गर्भाधान पूर्व गर्भसंस्कार (उत्तम प्रजोत्पादनासाठी) याशिवाय, जीवनशैलीमुळे होणाऱ्या व्याधी, जसे - मधुमेह, रक्तदाब, हृदयरोग, स्थोल्य, सांधेदुखी,स्त्रियांचे आजार याविषयीची माहिती वैद्य सुभाष मार्लेवार उपलब्ध करून देत आहेत.

Airmate A Multibrand A.C.Showroom

S.S.Dealers | LG | VOLTAS LIMITED | HITACHI Inspire the Next | Panasonic | VIDEOCON | BLUE STAR | SAMSUNG | DAIKIN | Carrier

Service Range:
- Gift on every purchase
- Exchange old with new A.C.
- Immediate delivery & installation
- On Annual Maintenance Contract
- On rental basis
- Guaranteed repairs of Indian & Imported ACs

0% Finance

Showroom : Dattatray Niwas, Shop No. 3, 'B' Block, Opp. Portugese Church, S. K. Bole Road, Dadar (E), Mumbai 28
T: 24301910, 24313073, 24302993
M: 9820043019
E: alhadaircon@yahoo.co.in
W: alhadaircon.com

# तळवळकर

-डॉ. अशोक कोर्डे

''परवा फोनवरून भेटायला येऊ कां? असं विचारलं होतं ना, तोच मी.''

''हो येस, तुम्हीच का ते? बरोबर.. आठवलं''

''बाहेर थांबू कां? कारण अजून पेशंट आहेत बाहेर''..

''म्हणजे तुम्ही पेशंट म्हणून नाही आलात?''

''नाही नाही, माझे वेगळेच काम आहे.''

''मग बसता कां? अर्धा-एक तास तरी लागेल''

''ओ येस! कितीही वेळ लागला तरी चालेल, प्रथम रुग्णसेवा!''

एका शनिवारच्या रात्रीचा दवाखान्यातील संवाद आहे हा. ह्या गृहस्थाच्या नंतरचा पेशंट तपासेपर्यंत 'त्याचा व त्याचे काम' ह्यावर माझ्या मनात चर्वितचर्वण चालू राहले. पेशंट पहाणे चालूच होते. आपली शारीरिक पेक्षा मानसिक स्थिती जास्त सविस्तरपणे सांगणारे पेशंट सध्या वाढल्याने त्या सहानुभूतिपूर्वक ऐकणे व त्यावर त्याना उत्तेजनार्थ सल्ला देणे ह्याचा सिलसिला चालू होता. आता वेगळ्या प्रकारची प्रॅक्टिस चालू करण्याचा माझा विचार बळावत चाललाय. हल्ली लोकांना आपल्या शारीरिक तक्रारीपेक्षा दुसऱ्याच समस्या जास्त असतात आणि त्या त्यांना आपल्या फॅमिली डॉक्टरने ऐकाव्यात असं वाटत असतं. त्या समस्यावर त्यांची उपाय ऐकण्याची पण अपेक्षा नसते. फक्त कोणीतरी आपलं ऐकावं असं त्यांना वाटतं म्हणून 'फक्त ऐकण्यासाठी' नावाचं क्लिनिक चालू करावसं वाटतंय.

सर्व पेशंट संपल्यावर ते गृहस्थ आत आले, ''माझ्यामुळे तुम्हाला उशीर होतोय, सॉरी...'' असं माफक बोलणं झालं. मी टेबल आवरता आवरता विचारलं, ''काय नांव म्हणालात तुमचं?''"

''तळवळकर''

मला एकदम पुलंनी शरद तळवलकरांची खिल्ली उडवतानाचा उद्गार आठवला..काना-मात्रा नसलेला माणूस. मी हसत त्यांना म्हणालो, ''पैलवान की कलाकार?'' ''नो, दोन्ही नाही. मी साधा माणूसच आहे. पण दोघांचे जीन्स माझ्यात आहेत. मी जाड्या पैलवान आहे म्हणून तळवळकर, जिम्नॅशियमचा माणूस आहे आणि बारिक डोळे-टक्कल ह्यामुळे शरद तळवलकरांसारखा ॲक्टर वाटतो.''

तो तळवळकर खरंच तसाच होता. साडेपाच फुट उंचीचा, सर्व शरीराला गोलाई होती. उर्ध्व-अधो भागाची गोलाई बॅलन्स व्हावी म्हणून उदर भाग गोल-मटोल होता. डोळे बारीक, भालप्रदेशापासून ते शीखाप्रदेशापर्यंत औषधालाही केस सापडणार नाही असे टक्कल होतं. हसतमुख चेहरा, कातरलेल्या मिशा, निळा चौकडी बुशशर्ट त्यामुळे पोटाला तंबूचा आकार आलेला. खांद्यावर झोळी. शरद तळवलकरांची बाहेरची आवृत्ती होती ती.

एक-दोन क्षण एकमेकांना जज् करण्यात गेले. मग ते म्हणाले, ''तुम्ही एकदा सावरकर केंद्रात 'मी पाहिलेला सावरकर' ह्या चर्चेत 'क्षितीजावरचा तेजोभास्कर' हा लेख वाचून दाखविला होतात, बरोबर?''

''बरोबर'' - मी म्हणालो.

''तेव्हा तुमचे अभिनंदन करताना तुमचा फोन नंबर घेतला होता म्हणून आज मी तुम्हाला भेटू शकतोय.''

माझ्या विस्मरणात गेलेल्या त्या घटनेची त्यांनी मला आठवण करून दिली. पण आज मला ते शोधत कां आलेत ते उमजेना. पण त्यांनीच स्पष्टीकरण करण्यास सुरूवात केली.

''मी एक वाचनप्रिय माणूस आहे. खूप वाचतो आणि कोणत्याही विषयावरचे सर्व वाङ्मय प्रकार मला आवडतात. वेडच आहे म्हणाना! त्यामुळे माझ्याकडे दैनिके, पाक्षिके, मासिके, दिवाळी अंक, पुस्तकं अमाप आहे. घर लहान पडले''

''पण, आजची दैनिके उद्याची रद्दी असते''

''हो, पण मग मी ती विकतो, त्यातून पैसे मिळाले की मग पुस्तकं खरेदी करतो. एकदा तर पुस्तक ठेवण्यासाठी मी ह्या पैशातून मोठे शेल्फ विकत घेतलं, त्यामुळे माझ्या छोट्याशा घरात आटोपशीरपणा आलाय.''

हा गृहस्थ मला एवढं का सांगतोय ते मला समजेना. पण मला इंटरेस्ट वाटू लागला होता. मी म्हणालो, ''तुम्ही भेटलात मला खरंच छान वाटतंय. टू मीट द पिपल इज माय हॉबी. पण तुम्हाला नेमके काय म्हणायचेय ते माझ्या लक्षात येत नाहीये.''

''तुम्ही माझ्या मिशनमध्ये सामिल व्हाल कां? व्हाच.''

''कुठलं मिशन?''

''हे बघा, सध्या लोकांना वाचायला वेळ नसतो. पैसा असूनही पुस्तकं खरेदीसाठी इंटरेस्ट नाही. उदासिनता आहे पण त्यांना ऐकायला आवडते. जर कोणी काही चांगले सांगत असेल...अन् तेही फुकट! तर ते ऐकतात. जास्त नाही पण अर्धा तास तरी ऐकतात. जास्त वेळ ऐकण्याची आपली कॅपसिटीच नाही. कारण अर्ध्या तासाचाच एक पिरीयड हे लहानपणापासून अंगवळणी पडल्याने ऐकणं व मेंदूत साठवणं बंद करतो. मग मी काय करतो, अर्ध्या तासात संपतील अशाच लिखाणाचं वाचन करतो''

''पण लोकं जमतात?''

''हो जमतात, काही वेळा उत्तम प्रतिसाद मिळतो तर काही वेळा शून्य. काही वेळा ह्या श्रवणानंतर चर्चा रंगते. तर काही वेळा उपहासात्मक शेरे येतात. टोमणे मारतात, सकारात्मक पाठींबा वाढतोय हे मात्र नक्की''

''कधी पासून तुम्ही हे वाचन प्रयोग करताहात?''

''आठेक वर्षे तरी झालीयेत. आमच्याकडे दीड दिवसाचा गणपती बसतो. एका गणेश चतुर्थीला मी आरतीला बोलावलेल्यांसमोर प्रसाद खाताना अनादी मी, अनंत मी वाचून दाखविली आणि त्याचा भावार्थ सांगितला. त्या लोकांना हे वेगळेपण इतकं आवडलं की, शेजारील घरात गणपतीसमोर अगदी असाच लेख वाचून दाखवला. त्यावर चर्चा पण झालीच. काव्य-गायन-विनोदामध्ये अर्धा तास मजेत गेला. मग काय, माझे वाचन प्रयोगच होऊ लागले. लेख-कविता मी फक्त वाचतो, मी अधिकारवाणीने त्यावर काहीच बोलत नाही. मी फक्त प्रारंभ

करतो, शेवट दुसरे करतात. जे वाचन होते ते प्रथितयश तज्ञांचेच असते त्यामुळे आपल्यावर कोणतेच बालंट नसते. त्यामुळे निरर्थक वाद पण होत नाही. पण चर्चा रंगतात. एका ठिकाणी तर ह्या कार्यक्रमामुळे त्या लोकांनी काही उपक्रम पण चालू केले.''

''सॉलिड आहे तुमची आयडिया ही, किती कार्यक्रम केलेत?''

''चिकार, गणपती, ऑफिस, संस्था, सोसायटी, सहली, अध्यापकांच्या बैठकीत. चांगला रिस्पान्स मिळतोय.''

''मग मला का गोवताय ह्या मिशनमध्ये? तुमच्या अपेक्षा तरी काय आहेत?''

''तुमचा मेडिकल किंवा इतर संस्थांशी संबंध असेलच. तेथे तुम्ही ह्या वाचन उपक्रमाचा प्रसार-प्रचार करावा. तुमचा व्यक्तिशः त्यात सहभाग असावा.''

''ओके, मी सांगेन तुमच्याबद्दल काही संस्थांमध्ये''

''नाही, नाही. तुमचा सहभाग हवाय तेथे तुम्ही वाचून दाखवायचं''

''अरे बापरे, मला कसं जमेल..?''

''नाही कसं जमणार? तुम्हीच तुमचा लेख वाचला होता ना दोन वर्षापूर्वी. सर्वांनी ॲप्रेशिएट केला होता.''

''ते वेगळं, ती एक उत्स्फूर्त प्रतिक्रिया होती. असं थोडंच लिहिणं होतं आपल्या हातून?''

''मग आता स्फूर्ती घेऊन करा. आपण थोडं आपलं लिखाण वाचायचय? तुम्ही नाही म्हणू नका. फार मजा येते. लोकरंजनाचा आनंद वेगळाच असतो''

''बघू या, बघू या'' मी लांबलेल्या चर्चेचा 'दी एन्ड' केला.

दोन चार दिवसांनी तळवळकरांनी त्यांच्या वाचनाच्या कार्यक्रमाचे आमंत्रण दिले. पण दवाखान्याच्या वेळेत ते बसणारे नव्हते. नंतर बरेच वेळा तसेच घडत गेले. नेहमीप्रमाणे ''यायचय हो, पण जमत नाहीच''चं पालुपद मी रेटत गेलो. एकदा नाटकाच्या मध्यंतरात भेट झाली. तेव्हा मी त्यांना विचारले, ''तुम्ही करता काय? कुठे राहता?''

''मी दहा वर्षापूर्वीच कौटुंबिक कारणामुळे बँकेची नोकरी सोडली. मला मुलं-बाळं नाहीत. माझा पार्ल्यात ब्लॉक आहे. तेथे आम्ही दोघंच राहतो, मजेत चाललय आमचं.''

एकदा ते हट्टालाच पेटले, ''दुपारीच कार्यक्रम आहे. तुम्ही माझ्या घरी अगोदर या. मग वाचन कार्यक्रम'' त्यांनी फोनवरून फर्मान सोडलं.

मला त्यांच्या घरी जावंच लागलं. दारावरची बेल वाजवल्यावर तळवळकरांनी दार उघडलं. ''या, बसा'' झालं. शेल्फमध्ये पुस्तकं खचाखच भरली होती. काही इतस्तः पसरली होती. मी घराचं अवलोकन करत होतो. समोरच्या दिवाणावर भिंतीकडे तोंड करून कोणीतरी पांघरूणाखाली झोपलं होतं. त्यांना त्रास नको म्हणून मी गप्प राहलो. तळवळकर कपडे करून पाणी घेऊन बाहेर आले.

आल्यावर ते म्हणाले, ''मंगला, कोण आलंय ते बघ'' माझ्याकडे बघत ते म्हणाले ''मंगला, माझी पत्नी'' त्यांनी पत्नीचे तोंड फिरवत, सरकवत कुशीवर झोपवलं.

मी चरकलोच, पूर्ण विकलांग झालेलं निस्तेज शरीर मला दिसत होतं. खोल भावशून्य डोळ्यांनी ती माझ्याकडे पहात होती. अति उत्साही, बोलक्या माणसाची ही पत्नी? माझं अस्तित्व जणू विरून जात होतं.

''दहा वर्षांपूर्वी माझ्या पत्नीला असाध्य रोगाचा तडाखा बसला. तिचे हळुहळू सर्व स्नायू शक्तिहीन झाले. ती बघते, पण तिला फारसे आकलन होत नाही. थोडं-फार ऐकायला येत असावं, कारण ते उमगल्याचे भाव चेहऱ्यावर उमटतात. त्या प्रतिक्रिया मी माझ्या समजून घेतो. डॉक्टरानी सांगितलंय, ह्यावर काहीही उपाय नाही.''

''प्रथम मी फार खचलो, तिच्या शुश्रुषेसाठी मी व्ही आर एस घेतली. तिला जगवणे एवढेच माझे ध्येय झाले. मी एकदा सुखकर्ता, दुःखहर्ता आरती तिच्या डोळ्यासमोर पंचारती घेऊन मोठ्याने म्हटली. तेव्हा तिच्या नजरेत एक वेगळीच चमक दिसली. तिला थोडं फार ऐकण्याला येतंय आणि ते कळतंय असं मला वाटू लागलं. मग तिला रोज काही ना काही वाचून दाखवायला लागलो. तिच्यापेक्षा माझ्या जीवनात एक चैतन्य फुललं.''

''आणि मग मी वाचन कार्यक्रमाचा पसारा सुरू केला'' त्यांनी मला न विचारता सर्व सांगितलं.



**डॉ. अशोक कोर्डे**
**9820435204**


## पाहिजेत

ब्राह्मण सेवा मंडळाच्या उद्योग
मंदिरासाठी सुपरवायझर
(स्त्री/पुरुष) नेमणे आहे.
उद्योग मंदिरातील स्वयंपाकघरात
काम करण्यासाठी
(पोळी-भाजी/नाश्ता)
कर्मचारी नेमणे आहे.
इच्छुकांनी मंडळाच्या कार्यालयात
त्वरीत संपर्क साधावा.

पत्ताः
ब्राह्मण सेवा मंडळ,
भवानी शंकर रोड,
दादर (प), मुंबई ४०० ०२८.
वेळ : सकाळी ८.३० ते १२.३०
दुपारी ४.३० ते ८.३०

फोनः २४२२९११८, २४३७१९४९

## लक्ष्यवेधी वाटचाल

**- सौ. मीनल वसमतकर**

गेल्या काही वर्षात, साहित्य-विश्वात अनेक नव-नवीन लेखकांची भर पडत आहे. साहित्य क्षेत्राच्या क्षितिजावर नवीन तारे, तारका चमकताना दिसतात. शिक्षणाचा प्रसार व सामाजिक जाणीव निर्माण झाल्याचा हा परिणाम असू शकतो.

अनेक महिला लेखन करताना आढळून येतात. महाराष्ट्रातील वाङ्मय रसिकांचे लक्ष वेधून घेत आहे असे चित्र दिसते.

कादंबरीचा कालखंड, सातव्या शतकात, बाणभट्टाच्या 'कादंबरी' पासून सुरू झाला असे समजण्यात येते. ह. ना. आपटे यांची 'उष:काल' ही मराठीतील पहिली कादंबरी आहे. तर मराठी साहित्यातील पहिल्या स्त्री कादंबरीकार म्हणून **मालतीबाई विश्राम बेडेकर** (१९०५-२००१) यांच्याकडे हा मान जातो. बाळूबाई खरे हे त्यांचे माहेरचे नांव, पण **विभावरी शिरुरकर**, या टोपणनांवाने त्या ओळखल्या जातात. स्त्री प्रश्नांना वाचा फोडणारे लेखन, सामाजिक जाणीव, स्त्री प्रश्नांसंबंधीची, आत्यंतिक तळमळ, हे त्यांच्या वाङ्मयातील लेखनाचे वैशिष्ट्य आहे. कर्वे व वामन मल्हार जोशी यांचा प्रभाव त्यांच्या लेखणीवर दिसून येतो. (१९३३) 'हिंदोळ्यावर' या कादंबरीत त्यांनी हुंडा व कायदा हे प्रश्न मांडून स्त्रीला प्रथम जागे केले. मध्यम वर्गातून आलेल्या त्या लेखिकेने (१९५०) 'बळी' या कादंबरीतून, आदिवासींचे प्रश्न व त्यांचे जीवन रेखाटले आहे. 'शबरी', 'विरलेले स्वप्न', 'खरे मास्तर', 'पारध' अशा अनेक कादंबऱ्या त्यांच्या गाजलेल्या आहेत.

अशा स्त्री लेखिकांचा विचार करताना **काशीबाई कानेटकर** यांचे नाव आवर्जून घ्यावे लागले. शाळेत जाऊन शिक्षण न घेताही मराठी, संस्कृत, इंग्रजी या भाषांमधून त्यांनी लिखाण केले. वयाच्या नवव्या वर्षी लग्न झालेल्या या लेखिकेला पती गोविंद कानेटकर यांचा पाठिंबा मिळाला व त्यांनी लिखाणाला सुरूवात केली. 'रंगराव' व 'पालखीचा गोंडा' या त्यांच्या दोन कादंबऱ्या आहेत. आजच्या जीवघेण्या स्पर्धेत पदवी म्हणजेच सर्वस्व नव्हे हा दृष्टिकोन तरुण पिढीने ठेवावा.

**डॉ. सुमती क्षेत्रमाडे** यांच्या 'महाश्वेता' व 'अनुहार' या दोन स्त्री प्रश्नांवर प्रकाश टाकणाऱ्या कलाकृती आहेत. 'महाश्वेता' मध्ये कोडाचा प्रश्न मांडला आहे. स्त्री सौंदर्याला लागलेला डाग जीवन होरपळून टाकतो. तर 'अनुहार' मध्ये 'गौराङ्ग महाप्रभू' म्हणजेच 'चैतन्य महाप्रभू' हे बंगालमध्ये मोठे संत होऊन गेले. त्यांची पत्नी 'विष्णुप्रिया' हे मैथिलीशरण गुप्तांचे छोटे खंडकाव्य. 'अनुहार' म्हणजे आकृती किंवा प्रतिमा या अर्थाने त्या कादंबरीला हे नाव दिले आहे. यात मुस्लिमांच्या जाचाला कंटाळून धर्मांतर करू लागलेले लोक, आपल्या नावापुढे 'खाँ' असे लावू लागले. तेव्हा या गौराङ्गप्रभूने, हिंदू समाज संघटित केला. हे कार्य गौराङ्गप्रभू करत असताना विष्णुप्रियाने आपले कर्तव्य समर्थपणे पार पाडले. याचे सुंदर दर्शन यात घडते.












'**इरावती कर्वे** (१९०५-१९६०)' मानव वंशशास्त्र, समाज शास्त्र आणि मानसशास्त्राच्या अभ्यासक असलेल्या या लेखिकेने 'युगान्त' सारखी कलाकृती निर्माण केली. त्याच बरोबर ललित लेखनही केले. त्यांना 'जाई', 'आनंद' व 'गौरी' ही तीन अपत्ये. त्यातील 'गौरी' म्हणजेच आजच्या सुप्रसिध्द लेखिका **गौरी देशपांडे**. यांनी आईचा वारसा समर्थपणे पेलला. त्यांच्या लेखणीतून 'निरगांठ', 'गोफ', 'चंद्रिके ग सारिके ग' अशा अनेक साहित्यकृती निर्माण झाल्या.

'**शांता शेळके** (१९२२-२००२)- भारत सरकारचा सर्वोकृष्ट लेखन पुरस्कार' प्राप्त, यशवंतराव चव्हाण पुरस्काराने गौरवल्या गेलेल्या, ग.दि.माडगूळकर पुरस्काराने सन्मानित केल्या गेलेल्या शांताबाईंनी 'ओढ', 'धर्म', 'पुनर्जन्म' अशा अनेक कादंबऱ्याबरोबरच, 'लुईसा मे अलकॉट' या अमेरिकन लेखिकेचे, 'लिटल वुईमेन' हे पुस्तक (१८६८) साली प्रथम प्रसिध्द झाले. 'गुड वाइव्हन' हा त्यांचा दुसरा भाग लेखिकेने आपल्या बालपणीच्या अनुभवाच्या आधारे, चार बहिणींच्या व्यक्तिरेखा रेखाटलेल्या आहेत. कोवळ्या आकांक्षा, स्वप्न सुखदु:खे, मनाला मोहवून टाकतात. लुइसाचा जन्म १८३२ ला जर्मन टाऊन येथे झाला. तर बोस्टन येथे निधन झाले. 'गुड वाईव्हन' याचा अनुवाद 'चौघीजणी' शांताबाईनी केलेला आहे.

'**विजया राजाध्यक्ष** (१९३३)', 'उत्तरार्ध' ही त्यांची गाजलेली कादंबरी, मर्ढेकरांची कविता, स्वरूप आणि संदर्भ यासाठी १९९३ ला 'साहित्य अकादमी पुरस्कार' प्राप्त. मराठी साहित्य संमेलन इंदूर (२००१) ला त्यांनी अध्यक्षस्थान भूषविले.

**'कविता महाजन'** यांची 'ब्र' ही कादंबरी. ब्र उच्चारणे सोपे नसते. कधी एका साधारण गृहिणीने, स्त्रीच्या नजरेने, निरागसपणाने पाहिलेले जग, आदिवासी भागातील स्वयंसेवी संस्था, त्यांचे राजकारण, स्त्री-पुरुष संबंध, शहर, खेडे, वाडे सर्वांना सामावून घेणारी ही कादंबरी म्हणजे ब्र.

आजच्या स्त्री-स्वातंत्र्य, स्त्री मुक्तीच्या या

काळात आवर्जून वाचाविशी वाटणारी कादंबरी म्हणजे **‘कुसुम बदेरकर’** यांची ‘मामलेदाराचा वाडा’. या कादंबरीत स्त्री स्वातंत्र्याचा व स्त्री मुक्तीचा गंध सुध्दा नसणारी म्हातारी यात रेखाटली आहे. स्वातंत्र्य मागून मिळत नाही. म्हातारीने ते तिच्या कर्तृत्वावर प्राप्त केले. स्वातंत्र्याचे झेंडे घेऊन ती मिरवली नाही. अशा स्त्री कर्तृत्वाची ही कहाणी आहे.

**‘मधुरा जसराज’** या पंडित जसराजांच्या पत्नी. त्यांनी ‘रज्जो’ ही कादंबरी, उस्ताद धग्गे, नजीरखाँ साहेबाच्या स्वराभोवती उस्ताद व रज्जो यांचे हळुवार प्रेम लेखिकेने रज्जोत रेखाटले आहे. आजच्या भडक प्रेमाच्या या काळात, रज्जोचे हळुवार प्रेम मनाला भुरळ घालते. **डॉ. तस्लिमा नसरीन** ही बंगला देशाची लेखिका. ‘शोध’, ‘निमंत्रण’, ‘फेरा’, ‘शरम’ या त्यांच्या गाजलेल्या कादंबऱ्या. १९९२ ला त्यांची ‘लज्जा’ ही कादंबरी आली. पण मुस्लिमांच्या विरोधात, ही कादंबरी लिहिली गेल्यामुळे १९९३ ला त्यावर बंदी आली. बांगला देशाने त्यांना हद्दपार केले. त्यानंतर त्या स्पेन, जर्मन, युरोप या देशात राहून त्या भारतात आल्या. भारताने त्यांना आश्रय दिला. लेखकांच्या लेखणीवर आणि कलाकारांच्या कृतीवर राजकीय दबाव अनेक वेळा आणले गेल्याचे हे उदाहरण आहे. त्या स्त्रीरोगतज्ञ असल्यामुळे स्त्रियांची वेदना त्यांनी खूप जवळून पाहिली आणि शस्त्र चालवता चालवता त्यांच्या लेखणीलाही धार आली. या सर्वांना सामोरी जाऊन त्यांनी आपली लेखणी स्त्रीच्या व्यथा समाजासमोर मांडण्यासाठी अव्याहत चालूच ठेवली.

‘**योगिनी जोगळेकर**’ यांनी अनेक कादंबऱ्यांचे लिखाण केले. कुटुंब, समाज व स्त्रीची होणारी ओढाताण हे विषय त्यांनी सातत्याने मांडलेले दिसतात. ‘बाबन्नकशी’, दहीहंडी’, ‘बायलेक’, ‘एक छोटा एक मोठा’ अशा अनेक कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. ‘एक छोटा एक मोठा’ मध्ये दोन भावांच्या गरीबी-श्रीमंतीचा प्रश्न, स्त्रीच्या हट्टी स्वभावामुळे जातो व कुटुंब विस्कटते. तर त्या उलट ‘कसरत’ मध्ये नोकरी करणाऱ्या स्त्रीला, घर व नोकरी ही कसरत करून घर चालवावे लागते. ‘बायलेक’ मध्ये माहेरी आलेल्या पहिलटकरणीच्या डोहाळ्याचे कोड-कौतुक आई करते.

अंगणीच्या वेलीबाई चढा झरारा मांडवी
माझी माहेरवाशीण आहे उन्हाला हळवी
वाऱ्या, सोयऱ्या धायऱ्या, घाला फुंकर भाताशी
लेक थकली भागली, आली माहेराशी

त्या काळात स्त्रीला आराम म्हणजे फक्त माहेर, असे विविध स्त्री मनाचे कंगोरे त्यांनी आपल्या लिखाणात दर्शविले आहेत.

**‘मालतीबाई दांडेकर’** (१९३०) मराठी साहित्याला एक लेखिका मिळाली. ‘स्त्री’, ‘माहेर’, ‘यशवंत’, ‘रत्नाकर’ इ. मासिकांतून त्यांनी लिखाण केले. नारदासारखी त्यांची लेखणी चौफेर संचार करते. नाट्य, कथा काव्य, कादंबरी, संशोधन, लोकसाहित्य इ. सामाजिक क्षेत्रातील सुधारणेचा विचारही स्त्रीच्या दृष्टिकोनातून त्यांनी केला. त्यांचे कसब प्रशंसनीय आहे. त्यांच्या लेखनात मार्मिक निरीक्षण, स्त्री स्वभावाचे अनेक बारकावे, जुने संस्कार व पुरोगामी विचारांचा समतोल आढळतो.

‘**सौ. सुशीला गुप्ते** (ठाकरे)’ (८ नोव्हेंबर १९२२) - सामाजिक कार्यात हिरीरीने भाग. या प्रबोधनकार ठाकरे यांची तृतीय कन्या. चार कादंबऱ्या, १९५० हून अधिक कथा. ‘लागो न दृष्ट माझी’, ‘आई तुझी आठवण’ या त्यांच्या गाजलेल्या कादंबऱ्या आहेत. **डॉ. स्वाती कर्वे** (१८५०-१९५०) परंपरा व आधुनिकता यात सापडलेल्या मराठी स्त्रीच्या सृजनशील, संवेदनशीलतेचे बहुरंगी दर्शन त्यांच्या लेखनात आढळते.

**‘निर्मला गोखले’** यांच्या ‘रखरखीत सावली’, ‘रेशमी धागे’, ‘राहिले ते गंगाजल’, ‘अपेशी’ यातून सामाजिक प्रश्नांवर लेखण केले आहे. त्यांची भाषा साधी व सोपी आहे. त्यात भ्याडपणा नाही.

**‘प्रतिभा हंप्रस’** यांची ‘बयो’ ही सध्या गाजत असलेली कादंबरी. साठ-सत्तर वर्षापूर्वीचा काळ, त्या वेळचा समाज, कौटुंबिक वातावरण, रुढी, परंपरा, अंधश्रध्दा व नीतीमूल्यांचा प्रभाव या सर्वांचे चित्रण म्हणजे बयो. भावकीतील धुसफूस, त्यांचा कावेबाजपणा, मतलबी नातेवाईक, ‘बयो’ ही व्यक्तिरेखा रेखाटतांना लेखिकेने अतिशय धैर्यवान व सहनशील स्त्रीचे चित्र रेखाटले आहे. भोळसट वाटणारा नवरा, वाढत जाणारी वंशवेल, यांना सांभाळत जीवनसंघर्ष करत, कुटुंबाला प्रगतिपथावर नेणारी बयो. दु:खात नियतीच्या करणीचा ठसा असतो. तो सल उराशी ठेऊन बयो दीनपणे तुळशीपाशी आपले मन रिते करते. विश्वातला आभास हा नियतीचा खेळ असतो, तर भावना बाजूला ठेऊन जीवन जगणे हा रोजचा दिनक्रम असतो. हे सत्य बयोच्या आयुष्याचा पदर उलगडून लेखिकेने उत्कटतेने दाखवून दिला आहे.

सूर्यकन्या सावित्री ही **‘मृणालिनी फळणीकरांची’** लघु कादंबरी. अरविंदाचे ‘सावित्री’ हे काव्य इंग्रजीत आहे पण हे वाचून लेखिकेने सावित्री रेखाटली. सावित्री साक्षात सूर्यकन्या. तेजोमय धगधगता अग्नी, भस्म करण्याची क्षमता असणारी पण आपल्या लाघवी बोलण्याने सत्यवानाला मृत्यूच्या दाढेतून परत आणणारी केवळ पतीचाच विचार न करता, आपले राज्य व सासू सासऱ्यांचे डोळे परत आणणारी सावित्री. आजच्या विस्कटलेल्या कुटुंब संस्थेवर प्रकाश टाकणारी व तरुण पिढीला मार्गदर्शक ठरते.

कादंबरी म्हणजे केवळ मनोरंजन असे नव्हे तर लेखिकांनी विविध विषय हाताळले आहेत. **डॉ. विजया वाड** यांनी ‘जीवन हिंदोळा’ यात एड्स रुग्णांच्या भावविश्वातील कथा रेखाटली आहे. तर **सरोजिनी शारंगपाणी** यांनी ‘टेस्ट ट्युब बेबी’ चा विषय हाताळला. **रेखा बैजल** यांची ‘पेटलेले झुंबर’, **कुमुदिनी रांगणेकरां**ची ‘चार उणे एक’, ‘ढगाळलेले आकाश’ **कुसुम अभ्यंकरां**ची ‘हरे राम! हरे कृष्ण!’, ‘सूड’, ‘विकेशी’ **शकुंतला गोगटें**ची ‘विपरीत’, ‘चंदनाची उटी’ **वैजयंती काळे** यांची ‘मोरपंखी’, ‘समोरी भरारी’ **शैलजा राजें**च्या अनेक कादंबऱ्या, यापैकी ‘आव्हान’ ही साहसपूर्ण, चित्तथरारक कादंबरी आहे.

अशा केवळ मनोरंजनासाठी पाहिल्या गेलेल्या या साहित्य कलाकृतींतून लेखिकांनी समाज जीवन, कुटुंब संस्था, युध्द, वृध्दाश्रम, क्रांतीकारी जीवन, हुंडाबळी, गुन्हेगारी जगत, अनाथ मुले, पूर, दुष्काळ, वेश्या असे अनेक प्रश्न मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.



**सौ. मीनल वसमतकर**
**9867020190**

॥ उद्धरेदात्मनात्मानम् ॥

ब्राह्मण सेवा मंडळाचे शतक महोत्सवी वर्ष डिसेंबर २०१५ ते डिसेंबर २०१६ संपन्न होणार आहे. हे वर्ष संस्मरणीय व्हावे अशी आमची इच्छा आहे आणि आपली सगळ्यांचीही असणार याची खात्री आहे.

कार्यकारिणीने या वर्षात प्रत्येक महिन्याला एक कार्यक्रम किंवा उपक्रम करण्याचे योजले आहे. साधारणपणे हा कार्यक्रम किंवा उपक्रमांची वर्गवारी धार्मिक, सांस्कृतिक किंवा करमणुकीचे कार्यक्रम, क्रीडा, वैद्यकीय, साहित्यिक, सामाजिक अशा शीर्षकांतर्गत केली आहे.

या संदर्भात एक उपसमिती नियुक्त केली असून त्यातील खालील सदस्यांना विषयवार निमंत्रक म्हणून जबाबदारी दिली आहे.

| | |
|---|---|
| धार्मिक | - श्री. विनायक लेले |
| सांस्कृतिक किंवा करमणुकीचे कार्यक्रम | - सौ. अधिता लेले |
| क्रीडा | - श्री. दिनेश गानू |
| वैद्यकीय | - श्री. अनिरुद्ध गोडसे |
| साहित्यिक | - श्री. अभय सावरकर |
| सामाजिक | - श्री. कौस्तुभ महाजन |

याशिवाय महाराष्ट्रातील ज्ञातीसंस्थांच्या सहयोगातून कार्य उभे रहावे अशी इच्छा आहे. या बाबतीत संपर्क आणि सहयोग सूत्रधार म्हणून श्री. शंतनु अभ्यंकर जबाबदारी सांभाळणार आहेत. निधी आणि प्रसिद्धी समित्यांमध्ये अनुक्रमे श्री. पुष्कराज सोमण आणि सौ. कल्पना साठे निमंत्रक म्हणून काम पाहणार आहेत.

आपल्या सर्वांच्या सहभागाशिवाय हे सर्व कार्यक्रम किंवा उपक्रम यशस्वी होऊ शकणार नाहीत आणि म्हणून आपल्याला आम्ही आवाहन करीत आहोत.

आपल्यापैकी ज्या सदस्यांना या कार्यक्रम वा उपक्रम आयोजित करण्याच्या प्रक्रियेत सहभागी व्हावयाचे असेल त्यांनी संबंधित निमंत्रकांशी संपर्क साधावा.

तसेच, या कार्यक्रम / उपक्रमांच्या स्वरुपाबद्दल आपल्या काही सूचना असतील तर संबंधित निमंत्रकाला लिखित स्वरुपात पाठवाव्या.

ब्राह्मण सेवा मंडळाच्या या शतकमहोत्सवी वर्षानिमित्त मंडळासाठी एक स्मृतिचिन्ह बनवावे अशी संकल्पना आहे.

मंडळाचे सभासद व त्यांच्या कुटुंबियांसाठी या निमित्त स्मृतीचिन्हाचे प्रारुप बनविण्याची एक स्पर्धा आयोजित करत आहोत.

स्मृतिचिन्ह मंडळाची परंपरा, दादरच्या सामाजिक आणि सांस्कृतिक वाटचालीतील मंडळाचे योगदान याचे समर्पक प्रातिनिधिक असावे अशी अपेक्षा आहे.

स्मृतिचिन्ह प्रारुप बनविताना माध्यमाचे बंधन नाही.

आपले प्रारुप ३० जून पूर्वी मंडळाच्या कार्यालयात सादर करावे.

शतक महोत्सव समिती एक विशेष समिती गठीत करुन आलेल्या प्रारुपांची छाननी करुन निर्णय घेईल. सदर समितीचा निर्णय अंतिम असेल.

आलेली सर्व प्रारुपे कोणतेही कारण न देता न निवडण्याचा अधिकार मंडळास आहे.

निवड झालेल्या प्रारुपानुसार स्मृतिचिन्ह शतक महोत्सवी वर्षात संपन्न होणाऱ्या कार्यक्रम / उपक्रमात निमंत्रित मान्यवरांना तसेच सत्कार समारंभात सत्कार मूर्तींना देण्यात येईल.

# चैत्रगौर हळदीकुंकू समारंभाची क्षणचित्रे







हे मासिक सौ. कल्पना साठे यांनी ब्राह्मण सेवा मंडळ यांचेसाठी नवलाई प्रिंट हाऊस प्रा. लि. पाईपलाईन, अंधेरी पूर्व येथे छापून ब्राह्मण सेवा मंडळ, भवानीशंकर रोड, दादर येथे प्रसिद्ध केले.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संचालक व संपादक सहमत असतीलच असे नाही.